सत्यमेव जयते

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१७ -२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**पुणे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबतचा अहवाल**

## सातवा अहवाल

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहाला दिनांक नोव्हेंबर, २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
नोव्हेंबर, २०१८

# अनुसूचित जमाती कल्याण समिती

## (२०१७ -२०१८)

## (तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**पुणे येथील जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/ कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच उक्त कार्यालयांतर्गत येणा-या शासकीय यंत्रणा व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयामार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यांत येणा-या योजनांबाबतचा अहवाल**

## सातवा अहवाल

एचबी १४३१–१

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१७-२०१८)

**समिती प्रमुखः-**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

**सदस्यः-**

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(३) श्री. पास्कर धनारे, वि.स.स.
(४) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(५) डॉ. पंकज भोयर, वि.स.स.
(६) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
(७) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.
(८) श्री. अमित घोडा, वि.स.स.
(९) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(१२) श्री. गोपिकिसन बाजोरिया, वि.प.स
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
(१५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव.
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).
(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी.

## अनुसूचित जमाती कल्याण समिती
## (२०१५-२०१६)

**समिती प्रमुखः-**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स.

**सदस्यः-**

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. नारायण कुचे, वि.स.स.
(५) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(६) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(७) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(८) प्रा. चंद्रकात सोनवणे, वि.स.स.
(९) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(१०) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(११) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
*(१२) श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स.
(१३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.
(१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स
(१५) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री. ना.रा. थिटे, उप सचिव.
(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती).
(४) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी.

*(१) मा. सभापती यांनी श्री. गोपीकिशन बाजोरिया, वि.प.स. यांची मुदत दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संपुष्टात आल्याने व ते पुन्हा विधानपरिषदेवर निवडून आल्याने दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी त्यांची समितीवर समिती सदस्य म्हणून फेरनियुक्ती केली आहे.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक (१) | विषय (२) | | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|---|
| | **प्रस्तावना** | . . | (सात) |
| (१) | जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे | . . | १ |
| (२) | जिल्हा परिषद, पुणे | . . | ९ |
| (३) | एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, जि. पुणे. | . . | २८ |
| (४) | बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | . . | ४७ |

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जमाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून **समितीचा सातवा अहवाल** सभागृहास सादर करीत आहे.

सन २०१५-२०१६ या कालावधीतील अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत पुणे येथे भेट देऊन बैठका घेण्यात आल्या होत्या. उक्त बैठकीत जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी व कर्मचारी वर्गाची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच शासकीय व जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत आदिवासी उपयोजना क्षेत्रातंर्गत अनुसूचित जमातीच्या लोकांसाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजना तसेच एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातंर्गत येणा-या शासकीय/अनुदानित आदिवासी आश्रमशाळांना भेटी देऊन पाहणी केली. उक्त बैठकीत झालेल्या चर्चेच्यावेळी समितीला दिलेल्या आश्वासित मुद्दयांच्या अनुषंगाने समितीने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७, दिनांक २५ एप्रिल, २०१८ व दिनांक १९ जून, २०१८ रोजी पुणे जिल्ह्यासंदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारविनिमय करून त्यासंदर्भात नोंदविलेले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

मंत्रालयीन विभागीय सचिवांनी तसेच संबंधित अधिका-यांनी समितीस माहिती देऊन केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

समितीने दिनांक **२८ नोव्हेंबर, २०१८** रोजीच्या बैठकीत प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

**विधान भवन:**
मुंबई,
दिनांक : २८ नोव्हेंबर, २०१८.

**प्रा. डॉ. अशोक उईके,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जमाती कल्याण समिती.

## अहवाल

## जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत पुणे जिल्ह्याचा दौरा आयोजित केला होता. सदर दौ-यात समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी भेट दिली. सदर भेटीच्या वेळी समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच या प्रवर्गासाठी राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांची माहिती घेतली.

**बिंदू नामावली :-**

समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील कर्मचा-यांच्या बिंदूनामावली तपासणीबाबत विचारणा केली असता जिल्हाधिकारी कार्यालयाने खालीलप्रमाणे माहिती दिली.

कार्यालयातील सर्व प्रवर्गाची सन २००७ आणि सन २०११ मध्ये सरळसेवेच्या पदांची बिंदूनामावली नोंदवहीची तपासणी झालेली आहे. सन २०१४ मध्ये बिंदूनामावली नोंदवहीची तपासणीसाठी सादर करावयास पाहिजे होती. परंतु, ते सन २०१५ मध्ये सादर केलेले आहे. त्यामध्ये ज्या त्रुटी होत्या त्याची पूर्तता केलेली आहे असे जिल्हाधिकारी, पुणे यांनी नमूद केले.

समितीने, प्रत्येक ३ वर्षांनी बिंदूनामावली तपासून घेणे आवश्यक आहे. बिंदूनामावली तपासून घेण्यास विलंब झाल्यामुळे अशा प्रकारच्या चुका होतात. आपण त्रुटींची पूर्तता करून २ महिन्यांच्या आत बिंदूनामावली तपासून घ्यावी आणि समितीला अहवाल सादर करावा असे निर्देशित केले असता यापूर्वी सन २००७ आणि २०११ मध्ये अव्वल कारकून, मंडल अधिकारी आणि लिपीक-टंकलेखक संवर्गाच्या सरळसेवेच्या पदांची बिंदूनामावली तपासणी झालेली आहे. सन २०१५ मध्ये बिंदूनामावली तपासणी होणे अपेक्षित होते. कार्यालयाची बिंदूनामावली २ महिन्यांत तपासून घेऊन समितीला अहवाल सादर करू असे जिल्हाधिका-यांनी आश्वासित केले.

**जात प्रमाणपत्र पडताळणी :-**

समितीने, उमेदवारांना नियुक्ती देताना त्यांच्याकडे जात पडताळणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासनाच्या दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या परिपत्रकानुसार नियुक्ती झाल्यानंतर ६ महिन्यांत संबंधित उमेदवाराने जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले पाहिजे. जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांची सेवा समाप्तीचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे असे निदर्शनास आणले असता जिल्हाधिका-यांनी, यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करून सेवा समाप्तीसाठी एक महिन्याची मुदत देऊन संबंधितांवर व विलंबास जबाबदार असणा-या अधिका-यांवर कार्यवाही करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील किती प्रकरणे जात वैधता प्रमाणपत्र समितीकडे प्रलंबित आहेत अशी

विचारणा केली असता सह आयुक्तांनी विदित केले की, जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून ६१ प्रकरणे पुणे समितीकडे प्राप्त झाली होती. यापैकी ५४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ७ प्रकरणे प्रलंबित आहेत. ५४ पैकी ४९ प्रकरणे वैध असून ३ प्रकरणे अवैध आहेत, श्री. सुधीर तेलंग यांचे प्रकरण दिनांक १६ फेब्रुवारी २०१३ रोजी अवैध ठरविले आहे. संगीता राऊत यांचे प्रकरण दिनांक २५ जुलै २०१३ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. श्रीमती सविता खामकर यांचे प्रकरण दिनांक २० जुलै २०१३ रोजी अवैध ठरविण्यात आले आहे. यापैकी श्री. तेलंग यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून त्यांची सेवा समाप्त करू नये असे कोर्टाचे आदेश आहेत.

समितीने, लिपिक-टंकलेखक व शिपाई संवर्गातील ९ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्र अप्राप्त आहेत, त्याचप्रमाणे तलाठी संवर्गातील एकूण १२ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र दिली नाहीत त्यांच्यावर काय कारवाई केली याबाबत विचारले असता निवासी जिल्हाधिका-यांनी विदित केले की, श्री.एस.एल.साबळे व श्री.गवारे यांना दिनांक १० फेब्रुवारी २०१२ रोजी बडतर्फ करण्यात आले आहे. उर्वरित प्रकरणे नंदूरबार समितीकडे माहे डिसेंबर २०११ मध्ये सादर केलेली आहेत. या ११ कर्मचा-यांवर शासन निर्णय दिनांक १८ मे २०१३ नुसार कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे लिपिक संवर्गात ज्यांच्या सन १९९५ पूर्वीच्या नियुक्त्या आहेत, त्यांना सेवेचे संरक्षण देण्यात आले आहे. श्री.कोळी यांची नियुक्ती सन २०१२ मधील आहे, त्यानंतर कुमारी मेघा दिलीप गवळी यांची नियुक्त दिनांक ९ जानेवारी २०१४ ची आहे. कुमारी मेघा दिलीप गवळी यांचे ठाकर जातीचे अनुसूचित जमातीचे प्रकरण तपासणीसाठी पुणे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे दिनांक २० एप्रिल २०१४ रोजी प्राप्त झाले आहे. सदर प्रकरणाबाबत दक्षता पथकाचा अहवाल प्राप्त करून दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी सुनावणी घेण्यात आली असून यासंदर्भात त्वरित निर्णय घेण्यात येईल असे जात पडताळणी समितीकडून अवगत करण्यात आले.

**सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे :-**

समितीने, सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत प्रकल्प अधिकारी कार्यालयाकडून सार्वजनिक बांधकाम मंडळास किती निधी प्राप्त झाला व त्यापैकी किती निधी खर्च झालेला आहे, याबाबत समितीला माहिती देण्यास सांगितले असता कार्यकारी अभियंत्यांनी समितीला खालीलप्रमाणे माहिती दिली.

सन २०१५-१६ मध्ये १२१.९२ लाख रुपये साकवसाठी प्राप्त झालेले आहेत. आता ती कामे सुरु आहेत. बांधकाम मंडळास सन २०१२-१३ मध्ये रस्ते आणि साकवची एकूण ३८ कामे घेण्यात आली होती आणि त्यासाठी १५४९.९१ लाख रुपये देण्यात आले होते. रस्ते, साकव आणि किमान गरजा या तिन्ही हेडची लेखी माहिती समितीला सादर केलेली आहे. सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये प्राप्त झालेला निधी शंभर टक्के खर्च झालेला आहे. सन २०१५-१६ ची कामे प्रगतीपथावर आहेत. यामध्ये आश्रमशाळांची ३२ कामे आणि अन्य विभागाची २ कामे अशी एकूण ३४ कामे सुरु आहेत. सद्य:स्थितीत १० कामे प्रगतीपथावर आहेत. ३२३४ मधील २० कामे पूर्ण झालेली आहेत आणि १० कामे प्रगतीपथावर आहेत.

आंबेगाव जि. पुणे येथे न्यू इंग्लीश स्कूल मंजूर करण्यात आले आहे. येथे १ हजार मुलांची प्रवेश क्षमता आहे. सन २०१२-१३ मध्ये ११ कामे, सन २०१३-१४ मध्ये १३ कामे आणि सन २०१४-१५ मध्ये ८ कामे पूर्ण झालेली आहेत. एकूण ५८ कामे आहेत. त्यामध्ये काही नवीन कामांचा समावेश आहे. मागील वर्षापर्यंतची जवळपास सर्व कामे पूर्ण झालेली आहेत. सभागृहाची ३ कामे अपूर्ण आहेत. जागेची अडचण असल्याने ती कामे पूर्ण झालेली नाहीत. आता ती कामे स्लॅब आणि लिंटर लेव्हल पर्यंत झालेली आहेत. व्हीआर आणि ओडीआरची कामे लवकरच पाठविली जातील.

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी :-**

समितीने, मागील ३ वर्षात किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झालेला आहे, याबाबत विचारणा केली असता कृषी अधिका-यांनी विदित केले की, सन २०१२-१३ मध्ये जुन्नर, आंबेगांव तालुक्यात टीएसपी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मजगीची कामे करण्यात आलेली आहेत. आंबेगांव तालुक्यात २४० हेक्टर क्षेत्रावर मजगीची कामे केलेली आहेत. जुन्नर तालुक्यात १० हेक्टर क्षेत्रावर सीसीटी केलेले आहे. तसेच, सन २०१२-१३ मध्ये जुन्नर आंबेगांव आणि खेड तालुक्यात पडकई योजनेची कामे केलेली आहेत. या कामांसाठी २४१.४७ लाख रुपये दिलेले आहेत. सन २०१३-१४ मध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे कामे झालेली नाहीत. आता विशेष सहाय्य योजने अंतर्गत निधी प्राप्त झालेला आहे. परंतु, बीपीएलची अट असल्यामुळे मर्यादित लाभार्थी मिळतात. बीपीएलची अट शिथिल केली तर पडकई योजनेचा निधी खर्च करणे सोईचे होईल. बीपीएलची अट शिथिल करण्याबाबतचा प्रस्ताव पाठविलेला आहे.

**वन विभाग :-**

समितीने, सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च झालेला आहे, याबाबत समितीला माहिती देण्यास सांगितले असता उप वन संरक्षकांनी खुलासा केला की, वन विभागाला सन २०१२-१३ मध्ये ५ कोटी ५८ लाख रुपये प्राप्त झाले होते, हा संपूर्ण निधी खर्च झालेला आहे. यामध्ये जंगल पुनर्स्थापित करणे, ज्या ठिकाणी जंगल नाही तेथे रोपांची लागवड करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. जुन्नर आणि आंबेगांव तालुक्यातील वन क्षेत्रात आदिवासी उपयोजनेंतर्गत अंतर्गत ही कामे करण्यात आलेली आहेत. डिंभे येथे रोपवाटिकेचे काम करण्यात आले आहे. दगडी चेक डॅम बांधणे, जल व मृद संधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेतलेली आहेत. बांबू या लागवडीतून ४-५ वर्षानंतर उत्पन्न सूरू होते. ओतूर भागात बांबुचे उत्पन्न सूरू झालेले आहे. पेसा ग्रामपंचायत आणि जेएफएम मार्फत लागवड केली जाते. या जिल्ह्यामध्ये ६३ गावे आहेत, त्या ठिकाणी वन पर्यटनाच्या संदर्भात काही कामे आणि नाविन्यपूर्ण योजनेतून त्या गावातील आदिवासी युवकांचा समूह गठीत केला आहे. त्यांना वन विभागामार्फत प्रशिक्षण देऊन ते लोक गाईड म्हणून काम करणार आहेत. जलविहार पर्यटन क्षेत्र ज्या ठिकाणी आहे तेथे ग्राम रक्षक दल म्हणून आदिवासी युवकांचा उपयोग होणार आहे. काही वस्तू उदाहरणार्थ टॉर्च, लाठी देऊन बिबट्या आल्यास संरक्षण करण्यासाठी त्यांना प्रशिक्षित केले जाते.

प्रशिक्षित मार्गदर्शक म्हणून त्यांना मानधन देत आहोत. नेचर टूरिझम अंतर्गत ४-५ किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटनाच्या दृष्टीने तंबू पुरविणे, गाईडला मार्गदर्शन, गाईड प्रशिक्षण हे कार्यक्रम केले आहेत. किल्ल्यावर लोकांना घेऊन जाणे आणि त्यांना किल्ल्याची माहिती करून देणे इ. कार्यक्रम डीपीडीसीच्या निसर्ग पर्यटनातून घेतले आहेत.

**विभागीय सचिवांची साक्षः-**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत पुणे जिल्ह्याचा अभ्यास दौरा केला होता. सदर दौ-याच्या अनुषंगाने समितीने दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७ व दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासंदर्भात साक्ष घेतली.

**जात प्रमाणपत्र पडताळणी :-**

सदर साक्षीच्या वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील जात प्रमाणपत्र पडताळणीबाबत विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग ३ मधील ०७ उमेदवारांपैकी ०६ उमेदवारांनी विहित कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले होते. यापैकी श्री. सुभाष मुपडे, लिपिक यांनी वेळेवर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही. श्री. मुपडे यांच्या नियुक्तीचा दिनांक २३ जुलै,२०१४ असून नियमाप्रमाणे सहा महिन्यांच्या कालावधीत म्हणजेच २३ जानेवारी, २०१५ रोजी त्यांना जात पडताळणी प्रमाणपत्राबाबत विचारणा करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे श्री. मुपडे यांना जात पडताळणी प्रमाणपत्राच्या अनुषंगाने नोटीसही बजाविण्यात आली होती. आतापर्यंत या कर्मचा-यांची सेवा तीन वर्षे नऊ महिने इतकी झालेली आहे. उच्च न्यायालयातून श्री.मुपडे यांच्यावर जात पडताळणीसंदर्भात कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये,असे आदेश प्राप्त झालेले आहेत. श्री.मुपडे यांना जात पडताळणी प्रमाणपत्र कार्यालयास सादर करण्यास विलंब झालेला आहे, यापाठी कोणताही वाईट हेतू नाही. जात पडताळणी समितीपुढे कामाचा व्याप जास्त असल्यामुळे याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. यासंदर्भात जात पडताळणी समिती योग्य ती कार्यवाही करून प्रमाणपत्र देईल.

यावर समितीने, दिनांक २३ जुलै,२०१४ रोजी श्री. मुपडे यांची नियुक्ती झाली असून त्यांच्याकडे जात वैधता प्रमाणपत्राची मागणी दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी करण्यात आली. त्यांना याबाबतची दुसरी नोटीस दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी देण्यात आले. त्यानंतर उच्च न्यायालयाचा याबाबतचा निकाल आला. परंतु या एकंदरित कार्यवाहीच्या प्रक्रियेकरिता जिल्हाधिकारी कार्यालयाने जो विलंब लावला, त्याची

कारणे काय आहेत? त्यांना नियुक्ती देतांना दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या कायद्याचे पालन करण्यात आले नव्हते का? नियुक्तीचे आदेश दिनांक १८ मे,२०१३ रोजीच्या शासनाच्या जात पडताळणी प्रमाणपत्राशी संबंधित असलेल्या शासननिर्णयाप्रमाणे सहा महिन्यांत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीसह आणि या प्रमाणपत्राकरिता केवळ ६ महिन्यांच्या मुदतवाढीसह दिले असते तर हे सर्व प्रश्न आलेच नसते असे मत मांडले असता विभागाने खुलासा केला की, त्याबाबत दिनांक ६ जुलै, २०१७ रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिला. त्यानंतर या संदर्भात बरेच जीआर, परिपत्रक काढण्यात आले. सन १९९५ पूर्वी जे कर्मचारी होते, ज्यांनी खोटे जात प्रमाणपत्र देऊन सेवेत आले किंवा ज्यांनी शासकीय संस्थांमध्ये प्रवेश घेतला. अशा उमेदवाराना जात पडताळणी समितीच्या माध्यमातून प्रमाणपत्र मिळण्याकरिता अधिनियम लागू झालेले आहेत. त्यानंतर २००१ पर्यंत अधिनियम लागू झाल्यानंतर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत की, जे काही शासन निर्णय, शासन परिपत्रक, आदेश आहेत, ते सगळे संविधानासमोर दुय्यम असल्यामुळे कोणालाही संरक्षण न देता सेवेतून काढायला पाहिजे, देशाच्या संविधानाच्या कलम १४१ व १४२ खाली हे शासनासह सर्वांना बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने मंत्री मंडळासमोर कॅबिनेट नोट सादर झाली आहे. मंत्रीमंडळ बैठकीत असा निर्णय झाला आहे की, सर्वोच्च न्यायालयाचा जो निकाल आहे, त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे करावयाची आहे, ते ठरविण्यासाठी मंत्रीमंडळाची उप समिती निर्णय घेईल, तोपर्यंत कोणालाही सेवेमधून काढावयाचे नाही.

त्यानंतर, समितीने ज्या कर्मचा-यांना नियुक्ती दिली आहे त्यांना जवळपास दोन वर्षांची मुदतवाढ दिली. त्यातच मा. न्यायालयाने नव्याने दिनांक २१ फेब्रुवारी, २०१७ रोजी आठ महिने मुदत वाढवून दिलेली आहे. न्यायालयाने वाढवून दिलेले आठ महिने निघून गेलेले आहेत तरी देखील विभागाने कारवाई केलेली नाही. संबंधित उमेदवारांनी वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, याबाबत जिल्हाधिका-यांनी जी अनियमितता, दुर्लक्षितता व जो विलंब केलेला आहे त्यावर प्रधान सचिवांनी आपले अभिप्राय देण्याबाबत विचारणा केली असता प्रधान सचिवांनी समितीस अवगत केले की, या प्रकरणात जिल्हाधिका-यांनी सांगितल्याप्रमाणे त्या कर्मचा-याला पहिल्यांदा दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी नोटीस दिलेली आहे. त्या कर्मचा-याला नियुक्ती दिल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्याने जातवैधता प्रमाणपत्र सादर करायला पाहिजे होते. सेवेत रुजू झाल्याच्या तारखेपासून दिनांक २३ जानेवारी २०१५ पर्यंत ६ महिन्यांची मुदत संपली होती, म्हणून त्यांनी लगेचच कारवाई करणे अपेक्षित होते, परंतु त्यांनी या प्रकरणात न करता दिनांक २३ फेब्रुवारी २०१६ रोजी नोटीस दिली. त्या नोटिसीच्या विरोधात तो कर्मचारी उच्च न्यायालयात गेला. दिनांक २१ फेब्रुवारी २०१७ रोजी ८ महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र संबंधित समितीने द्यावे आणि त्या व्यक्तीविरुद्ध कसल्याही प्रकारची कारवाई करु नये असे आदेश दिल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करता

आली नाही. आठ महिने होऊन गेले तरी देखील अजूनपर्यंत त्यांना जातवैधता प्रमाणपत्र मिळालेले नाही. जिल्हाधिका-यांनी जात पडताळणी समितीकडे पाठपुरावा केलेला आहे. दिनांक २३ जानेवारी २०१७ रोजीचे पत्र आणि त्यानंतर दिनांक ३१ जानेवारी २०१८ रोजी स्मरणपत्र दिलेले आहे. दिनांक २३ जानेवारी २०१५ च्या पत्रान्वये कार्यालयाने या कर्मचा-यावर कारवाई करता आली असती, परंतु कारवाई न करता जवळपास तेरा महिन्यानंतर नोटीस दिली. तत्कालीन जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना नोटिसा दिल्या असता त्यांनी खुलासा सादर केलेला आहे की कार्यबाहुल्यामुळे आम्हाला वेळ मिळाला नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाने दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कारवाई करणे अपेक्षित होते. तसेच दिनांक ११ डिसेंबर २०११ रोजीचाही शासन निर्णय आहे, परंतु याप्रमाणे अंमलबजावणी झालेली नाही. हा व्यापक प्रश्न असल्याने अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय घ्यायचा असेल तर सामान्य प्रशासन विभागाशी चर्चा करावी लागेल. केवळ आपल्याला या विभागापुरताच विचार करुन चालणार नाही. सामान्य प्रशासन विभागाशी सल्ला मसलत करुन तो विभाग जशा सूचना करील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**बिंदू नामावली :—**

समितीने, दिनांक ६ जुलै, २०१७ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार नव्याने निर्णय होणे अपेक्षित आहे. शासकीय, निमशासकीय/महामंडळाच्या सेवेत बिंदू नामावलीनुसार आरक्षण ठेवले जाते. अनुसूचित जमातीच्या आरक्षित बिंदूवर त्या माणसाला लाभ भेटला पाहिजे ही त्याची भूमिका आहे. एखाद्या कर्मचा-याकडे वैधता प्रमाणपत्र नसताना प्रशासनाकडून त्याला वाचविण्याची भूमिका पार पाडली जाते. शासनाचा धोरणात्मक निर्णय होऊन त्यानुसार नियुक्त्या झाल्या पाहिजेत. जोपर्यंत संबंधित कर्मचारी वैधता प्रमाणपत्र सादर करत नाही तोपर्यंत त्यांना कायमस्वरुपी नोकरी न देणे अशाप्रकारचा धोरणात्मक निर्णय घेता येणे शक्य आहे काय, याचा विचार करावा. दिनांक १८ मे २०१३ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. चौदा-चौदा महिने कारवाई होत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. या प्रकरणांमध्ये झालेली अनियमितता, दुर्लक्षितपणा यासंबंधी विभागाने कारवाई करुन समितीला अहवाल सादर करावा, असे समितीने निदेश दिले.

समितीने, सन २०११ नंतर सरळसेवा/पदोन्नतीची बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी केव्हा करण्यात आली आहे. बिंदू नामावली सहायक आयुक्त कार्यालयास सादर करण्यात आली आहे काय? बिंदू नामावलीची तपासणी करतेवेळी कोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत? जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या तसेच सेवेतून कमी केलेल्या अधिकारी/कर्मचा-यांकडून सेवेत रुजू झाल्यानंतर व सेवेतून कमी करण्यात आल्यावर संबंधितांच्या वेतनातून वसुली करण्यात आली आहे काय? असा प्रश्न केला असता जिल्हाधिका-यांनी विदित केले की, सन २०११ नंतर सन २०१५ मध्ये बिंदू नामावली प्रमाणित केलेली आहे अव्वल कारकून, लिपिक-टंकलेखक सरळसेवा, शिपाई या कॅडरची मागासवर्गीय कक्षाकडून

तपासणी झालेली आहे. अव्वल कारकून, लिपिक-टंकलेखक या पदांची बिंदूनामावली तपासणी सन २०१५ मध्ये झालेली आहे. अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, या पदाची दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी, लिपिक-टंकलेखक पदोन्नतीसाठी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी तपासणी झालेली आहे. सन २०१८ साली लिपिक-टंकलेखक सरळसेवा दिनांक ३१ मार्च, २०१८, वाहन चालक दिनांक १४ मार्च, २०१८, शिपाई (सरळसेवा) दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजी बिंदूनामावलीची तपासणी झालेली आहे. उर्वरित सरळसेवेच्या पदांबाबत शासन निर्णयाप्रमाणे बदल झाल्यामुळे सरळसेवा आणि पदोन्नतीने पदे भरण्याबाबत थोडी अडचण होती. जिल्हाधिकारी कार्यालयातील शिपाई, वाहन चालक, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, या संवर्गाची १६६३ पदे मंजूर असून यामध्ये २२५ पदे रिक्त आहेत. पुणे जिल्ह्यातील बिंदू नामावलीत बदल झाला आहे. सन २०१४ मध्ये सरळसेवेच्या लिपिक-टंकलेखक पदामध्ये ७५:२५ टक्के प्रमाण होते. सन २०१६ मध्ये ५०:५० टक्क्याचे प्रमाण झाले. त्यानंतर सन २०१७ मध्ये ५९ टक्के पदे सरळसेवा आणि ४० टक्के पदोन्नती आणि १ टक्के वाहन चालक असा निर्णय घेण्यात आला. अशा प्रकारे शासन निर्णयामध्ये थोडासा बदल झाल्यामुळे उशीर झालेला आहे.

समितीने, पुणे जिल्ह्यात पेसा कायदा लागू झालेला आहे या कायद्याची परिपूर्ण अंमलबजावणी करणे गरजेचे होते विभागीय आयुक्तांनी पेसा कायद्याप्रमाणे अंमलबजावणी करायला पाहिजे होती. यावर समितीच्या सूचनेप्रमाणे पेसा कायद्याच्या तरतुदीनुसार अनुशेष शिल्लक असेल तर त्या पदांची बिनाविलंब भरती केली जाईल. पुणे जिल्हातील जुन्नर आणि आंबेगाव येथे पेसा कायद्यानुसार रोस्टर मंजूर आहे. पेसा कायद्यानुसार अनुशेष भरण्यासाठी तीन वर्षांचा विलंब झाला आहे, ही वस्तुस्थिती आहे. यासंदर्भात शासन निर्णयामध्ये सतत बदल होत असल्यामुळे प्रस्ताव पुढे गेलेला नाही असे जिल्हाधिका-यांनी विशद केले.

**अभिप्राय व शिफारशी :–**

**बिंदू नामावली व अनुशेष :—**

(१) समितीने, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाला दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी भेट दिली होती त्यावेळी समितीने जिल्हाधिकारी कार्यालयातील बिंदूनामावली अद्यावत ठेवण्यात आली आहे काय, याबाबत विचारणा केली असता बिंदूनामावली सन २०११ मध्ये तपासण्यात आली असल्याचे सांगण्यात आले वास्तविक दर तीन वर्षांनी बिंदूनामावली तपासून घेणे आवश्यक असताना सन २०११ पासून बिंदूनामावली तपासून घेतली नसल्याने समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यानंतर दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळीही जिल्हाधिकारी कार्यालयातील सरळसेवेने भरावयाच्या लिपिक-टंकलेखक, वाहन चालक व शिपाई या पदांची बिंदूनामावली मार्च, २०१८ पर्यंत तपासण्यात आली असली तरी जिल्हाधिकारी कार्यालयातील “अ” ते “ड” संवर्गाच्या उर्वरित अधिकारी, कर्मचा-यांची बिंदूनामावली तपासणी अपूर्ण असल्याचे समितीस आढळून आले. सन २०१६ मध्ये समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे येथे भेट दिली त्यावेळी बिंदूनामावली अपूर्ण असल्याने दोन महिन्यांत बिंदूनामावली तपासून

घेण्याबाबत समितीने निदेश दिले असतानाही उक्त संवर्गातील बिंदूनामावली दोन-दोन वर्षांपासून अद्यावत करण्यात आलेली नाही. **सबब, जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व संवर्गातील बिंदूनामावल्या दोन महिन्यांत अद्यावत करुन तपासून घेण्यात याव्यात तसेच बिंदूनामावली तपासण्यास विलंब लावणा-या अधिका-यांवर कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

(२) राज्यात सन २०१६ पासून पेसा कायदा लागू झालेला आहे. या कायद्याची परिपूर्ण अंमलबजावणी करणे गरजेचे होते. तथापि, दुर्देवाने पुणे जिल्ह्यात या कायद्याची म्हणावी तशी अंमलबजावणी झालेली नाही. पुणे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आदिवासी समाज असूनही त्यांचा अनुशेष भरण्याची अनास्था शासनाकडून होत आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यात पेसा कायद्यानुसार बिंदूनामावली मंजूर झालेली असूनही मोठया प्रमाणात भरतीचा अनुशेष असल्याचे समितीस आढळून आले आहे. पेसा कायद्याची अमंलबजावणी करण्यास तीन वर्षाचा विलंब झालेला आहे. **अतः पुणे जिल्ह्यात पेसा कायद्याची योग्य रितीने परिपूर्ण अंमलबजावणी करुन पेसा क्षेत्रातील अनुशेष लवकरात लवकर भरण्याची कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**जात प्रमाणपत्र पडताळणी :—**

(३) समितीने दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीच्या सद्यःस्थितीबाबत विचारणा केली असता जिल्हाधिका-यांनी नमूद केले की, जिल्हाधिकारी कार्यालयातील वर्ग-३ मधील ७ उमेदवारांपैकी ६ उमेदवारांनी विहित कालावधीत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले आहे. यापैकी श्री. सुभाष मुपडे, लिपिक यांनी वेळेवर जातपडताळणी प्रमाणपत्र सादर केले नाही. श्री. मुपडे याच्या नियुक्तीचा दिनांक २३ जुलै, २०१४ असून नियमाप्रमाणे सहा महिन्यांच्या कालावधीत म्हणजेच दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी त्यांनी जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते. ज्यादिवशी जातपडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याची मुदत संपली त्याचवेळी जिल्हाधिकारी कार्यालयाने त्याना नोटीस देणे गरजेचे होते. तथापि त्यानंतर दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी म्हणजेच एक वर्षापेक्षा जास्त विलंबाने जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे त्यांना नोटीस बजावण्यात आली असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाने वेळेवर कारवाई न करता कारवाईच्या प्रक्रियेस विलंब लावलेला आहे. दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे सहा महिन्यांत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर नियुक्ती दिली असती तर विलंब झाला नसता. एखाद्या प्रकरणावर १४ महिन्यांनी सुद्धा कारवाई होत नाही ही बाब अतिशय गंभीर आहे. **उक्त प्रकरणामध्ये झालेला दुर्लक्षितपणा व विलंबास कारणीभूत असलेले अधिकारी व कर्मचा-यांवर तसेच जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर न करणा-या उक्त कर्मचा-यावर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल तीन महिन्यांत समितीला सादर करावा अशी शासनास समिती शिफारस करीत आहे.**

(४) अनुसूचित जमाती कल्याण समितीने माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये जिल्हाधिकारी कार्यालयास भेट दिली होती. त्यानंतर दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी समितीने मंत्रालयीन सचिवांची साक्ष आयोजित केली होती. समितीने केलेल्या दौ-यापासून म्हणजेच सन २०१६ ते २०१८ या कालावधीत कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची बिंदूनामावली तपासणे, जात प्रमाणपत्र तपासणी, सरळसेवा व पदोन्नतीने करावयाची नियुक्ती या सर्व बाबीमध्ये मोठया प्रमाणात अनियमितता, विलंब व गोंधळ असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे विशेषतः बिंदूनामावली व जात प्रमाणपत्र तपासणी आणि त्याआधारे द्यावयाच्या नेमणुका याबाबत एकसूत्रीपणा असणे अत्यंत आवश्यक आहे.

सन १९९५ पुर्वीच्या व सन १९९५ नंतरच्या भरतीसाठी दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी काही मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. परंतू या शासन निर्णयाचे जिल्हाधिकारी कार्यालयासह जिल्ह्यातील इतर महत्वाच्या आस्थापनामध्ये पूर्णपणे पालन झाल्याचे कुठेही आढळून येत नाही. दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या निर्णयाची कठोरपणे अंमलबजावणी न झाल्यामुळे अनेक अधिकारी व कर्मचारी मा. न्यायालयात प्रकरण नेऊन ते वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्याची वृत्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातच यासंदर्भात शासन अनेकदा वेगवेगळे निर्णय किंवा परिपत्रके पारित करीत असल्यानेही विलंब होतो. या विलंबामुळे पात्र उमेदवारास संधीपासून वंचित राहावे लागते. यासाठी अशा प्रकरणांबाबत शासनाने मुंबई उच्च न्यायालयात विशेष सरकारी वकील नेमून प्रकरणे निकाली काढण्यासाठी त्वरित निर्णय घ्यावा. तसेच यामध्ये काही त्रुटी असल्यास संबंधित कर्मचा-यास त्या तात्काळ पूर्ण करण्यास पाठपुरावा करावा. **अशी प्रकरणे न्यायालयात नेऊन वर्षानुवर्षे प्रलंबित ठेवण्याच्या कर्मचारी/अधिका-यांच्या वृत्तीस आळा घालण्यासाठी उपाययोजना आखून दिनांक १८ मे, २०१३ च्या शासन निर्णयाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी व यामध्ये सुसूत्रता आणण्यासाठी आदिवासी विकास विभाग, महसूल विभाग व सामान्य प्रशासन विभागाने एक परिपूर्ण प्रस्ताव तयार करुन धोरणात्मक निर्णय घ्यावा व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

## जिल्हा परिषद, पुणे

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २३ फेब्रुवारी २०१८ रोजी जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्यावेळी समितीने पुणे जिल्हा परिषद कार्यालयांतर्गत कार्यरत असलेल्या विविध विभागांमध्ये संवर्गनिहाय वर्ग-३ व वर्ग-४ मध्ये किती पदे मंजूर आहेत, यामध्ये अनुसूचित जमातीसाठी किती पदे राखीव आहेत, त्यापैकी किती पदे भरण्यात आलेली आहेत याबाबत समितीला माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

**कर्मचारी भरती, बढती व आरक्षण :—**

जिल्हा परिषदेत वर्ग-३ ची एकूण १६,६७३ पदे आणि वर्ग-४ ची एकूण १,०३९ पदे मंजूर आहेत. त्यात वर्ग-३ मधील अनुसूचित जमाती प्रवर्गाची १,०४० पदे सरळसेवेद्वारे व १०५ पदे पदोन्नतीद्वारे भरावयाची

आहेत. यापैकी सरळसेवेची ९४६ पदे व पदोन्नतीची ९५ पदे भरलेली असून सरळसेवेची ९४ पदे आणि पदोन्नतीची १० पदे रिक्त आहेत. वित्त विभागामध्ये पदोन्नतीने भरावयाची वरिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची ३ पदे व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाचे सरळसेवेने भरावयाचे १ पद रिक्त आहे. ग्रामपंचायत विभागातील विस्तार अधिकारी (पं.) संवर्गाचे पदोन्नतीने भरावयाचे १ पद रिक्त आहे. बांधकाम (उत्तर) विभागातील कनिष्ठ अभियंता संवर्गाची पदोन्नतीने भरावयाची ४ पदे व स्थापत्य अभियांत्रिकी संवर्गातील सरळसेवेने भरावयाची २ पदे रिक्त आहेत. महिला व बाल कल्याण विभागातील पर्यवेक्षिका संवर्गाची सरळसेवेने भरावयाची २ पदे रिक्त आहेत. आरोग्य विभागातील सरळसेवेने भरावयाची आरोग्य सेवक पुरुष संवर्गाची २ पदे व आरोग्य सेवक महिला संवर्गाची १० पदे रिक्त आहेत. तसेच, शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी (श्रेणी-३) संवर्गाची सरळसेवेने भरावयाचे १ पद व पदोन्नतीने भरावयाची २ पदे आणि प्राथमिक शिक्षक संवर्गाची सरळसेवेने भरावयाची ७६ पदे रिक्त आहेत. अशी एकूण सरळसेवेची ९४ पदे व पदोन्नतीची १० पदे रिक्त आहेत. सरळसेवेने भरावयाची प्राथमिक शिक्षक संवर्गाची ७६ पदे रिक्त आहेत वित्त विभागातील वरिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची पदोन्नतीने भरावयाची ३ पदे व कनिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाचे सरळसेवेने भरावयाचे १ पद रिक्त आहे. पात्र कर्मचारी उपलब्ध नसल्यामुळे ही पदे रिक्त राहिलेली आहेत. कनिष्ठ सहाय्यक हे लिपिक संवर्गाचे पद आहे. कनिष्ठ सहाय्यक पदावरुन कनिष्ठ सहाय्यक (लेखा) हे पद निर्माण होऊन या पदाचा स्वतंत्र संवर्ग तयार झालेला आहे. जानेवारी, २०१६ पासून कनिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाचे १ पद रिक्त आहे. अनुसूचित जमातीची वरिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची पदोन्नतीची ३ पदे रिक्त आहेत. जिल्हा परिषदेकडून जानेवारी, २०१५ मध्ये या पदासाठी कर्मचा-यांकडून विकल्प घेण्यात आला होता. जे विकल्प प्राप्त झाले त्यांना कनिष्ठ सहाय्यक (लेखा) पदावर नियुक्ती दिलेली आहे. जोपर्यंत पात्र उमेदवार उपलब्ध होत नाहीत तोपर्यंत जिल्हापरिषदेला वरिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची पदोन्नतीची पदे भरता येत नाहीत. तसेच वरिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची पदोन्नतीची ३ पदे सन २०१२ आणि २०१६ पासून रिक्त आहेत. कनिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध झाल्यानंतर वरिष्ठ सहाय्यक (लेखा) संवर्गाची पदोन्नतीची पदे भरली जातील. कनिष्ठ सहाय्यक (लेखा) हा ३९ पदांचा संवर्ग आहे. हा संवर्ग पूर्वी एकत्रित होता. त्यामुळे पदे भरण्याची कार्यवाही एकत्रित होत होती. परंतु, फेब्रुवारी, २०१५ पासून हा संवर्ग वेगळा करण्यात आलेला आहे. या ३९ पदांची बिंदु नामावली तयार करुन घेतलेली आहे. बिंदु नामावली तपासून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

समितीने, बांधकाम विभाग (उत्तर) मध्ये कनिष्ठ अभियंत्याची ४ पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की, त्या पदावर स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक संवर्गातून पदोन्नती दिली जाते. त्या केडरमध्ये पात्र कर्मचारी नसल्यामुळे ही पदे रिक्त आहेत. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक हे पद समावेशनातून तयार होते. कनिष्ठ अभियंता हे तांत्रिक ज्ञान असणारे पद आहे. या कर्मचा-यांना तांत्रिक ज्ञान नसल्यामुळे त्यांना पदोन्नतीसाठी सूट देण्यात यावी असे प्रस्तावित केले होते. स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून वय वर्ष ४५ पूर्ण झालेल्या उमेदवारांना परीक्षेतून सूट मिळाली आहे. त्यांची पदोन्नती प्रक्रिया सुरू आहे. यातील २ पदे सरळसेवेने भरावयाची आहेत.

**जात प्रमाणपत्र पडताळणी :—**

समितीने, जिल्हा परिषदेत जात पडताळणीच्या तपासणीमध्ये अवैध ठरलेली प्रकरणे आहेत काय अशी विचारणा केली असता सह आयुक्तांनी खुलासा केला की, आतापर्यंत पुणे जिल्हा परिषदेकडून १४४ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे तपासणीसाठी प्राप्त झाली होती. त्यापैकी १४२ प्रकरणांमध्ये निर्णय दिला असून २ प्रकरणे प्रलंबित आहेत. जिल्हा परिषदेची २४ प्रकरणे अवैध ठरली आहेत. श्री. नरेंद्र अमृतराव बाळसराफ (हलबा) दिनांक २३ नोव्हेंबर, २०१२ व श्रीमती विणा रोकडे (कोळी) दिनांक २० ऑक्टोबर, २०१२ रोजी जात पडताळणी प्रमाणपत्र अवैध ठरली आहेत.

यावर, जिल्हा परिषदेने पुढे अशीही माहिती दिली की, २४ कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे अवैध ठरली, त्यापैकी १८ कर्मचारी प्राथमिक शिक्षक होते. या १८ लोकांना सेवेतून कमी केले आहे. त्यापैकी ८ लोकांना माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे किंवा निकालाप्रमाणे पुनर्स्थापित केले आहे. त्याचबरोबर सामान्य प्रशासन विभागातील कनिष्ठ सहाय्यक यांना सन २००९ मध्ये कमी करण्यात आले आहे. ग्रामपंचायत विभागातील ३ कर्मचा-यांना कमी करण्यात आले होते, त्यापैकी एका कर्मचा-याला न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पुन्हा सेवेत सामावून घेतले असून २ कर्मचारी अजूनही  सेवेबाहेर आहेत. ग्रामपंचायत विभागातील आठ शिक्षकांना नागपूर खंडपीठाच्या आदेशाप्रमाणे सेवेत सामावून घेतले. उर्वरित १० प्रकरणे अवैध होती. श्री.संजय सोरटे नावाचे कर्मचारी होते, ते सन १९९५ मध्ये सेवेत रूजू झाले. त्यांचे प्रकरण अवैध ठरल्यानंतर त्यांना दिनांक ८ जानेवारी, २०१० रोजी सेवेतून कमी केले. दिनांक १९ जुलै, २०११ रोजी ते उच्च न्यायालयात गेले आणि त्यांना दिनांक २३ नोव्हेंबर, २०११ रोजी पुन्हा सेवेत घ्यावे लागले. दिनांक २५ नोव्हेंबर, २०११ रोजी नागपूर खंडपीठाने त्यांचा प्रस्ताव पुन्हा फेटाळला. त्यानंतर जिल्हापरिषदेने त्यांना १० जानेवारी २०१२ रोजी पुन्हा सेवेतून कमी केले. ते पुन्हा न्यायालयात गेल्यामुळे त्यांना पुन्हा सेवेत घ्यावे लागले. नागपूर येथील जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने त्यांचा प्रस्ताव २ फेब्रुवारी, २०१६ रोजी दक्षता पथकाकडे पाठविला आहे. या प्रकरणाचा एकंदरीत विचार केला तर एकूण २४ प्रकरणे अवैध ठरली होती, त्यापैकी १४ कर्मचा-यांना सेवेतून कमी केले आहे तर १० कर्मचारी कोर्टाच्या आदेशाने सेवेत कार्यरत आहेत. १० कर्मचा-यांनी कोर्टात रिट पिटिशन दाखल केले, त्या व्यक्तींच्या नावासमोर ते कोणत्या कोर्टाच्या आदेशाने सेवेत आहेत त्याचा तपशील या ठिकाणी दिलेला आहे. श्री.सोरटे यांच्या केसबद्दल अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विस्ताराने माहिती दिली आहे. सुरुवातीला सांगितले होते की, सहा महिन्यांच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करावे. सहा महिन्यात वैधता प्रमाणपत्र न मिळविल्यामुळे त्यांना सेवेतून कमी केले. पुन्हा न्यायालयाच्या आदेशाने ते सेवेत कार्यरत आहेत.

समितीने, जिल्हा परिषद कार्यालयांतर्गत अनुसूचित जमातीच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची किती प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहेत. त्याचप्रमाणे दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयान्वये प्रलंबित प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आलेली आहे ? अशी विचारणा केली असता जिल्हापरिषदेतर्फे सांगण्यात आले की, वर्ग-३ ची १७ व वर्ग-४ चे १ प्रकरणे जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे, याबाबत संबंधित कर्मचा-यांना लेखी नोटीस देण्यात आल्या आहेत. तथापि, सह आयुक्त, जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे यांनी आमच्या समितीकडे एकूण २४ प्रकरणे आलेली आहेत असे सांगितले. ही प्रकरणे वेगवेगळ्या जात पडताळणी समितीकडे सादर करण्यात आलेली आहेत. पुणे समितीकडे ८ प्रकरणे, नाशिक समितीकडे १ प्रकरण, औरंगाबाद समितीकडे २ प्रकरणे, अमरावती समितीकडे २ प्रकरणे, नंदूरबार समितीकडे २ प्रकरणे व नागपूर समितीकडे २ प्रकरणे अशा प्रकारे १७ प्रकरणे प्रलंबित आहेत. यामध्ये सन १९९५ पूर्वीची ७ प्रकरणे आहेत, सन १९९५ ते २००१ दरम्यानची ८ प्रकरणे आहेत, सन २००१ ते २०१५ पर्यंत २ प्रकरणे आहेत. श्रीमती के.एम.मोंदेकर व श्री.एम.बी.चव्हाण यांना सेवेतून काढून टाकण्याची नोटीस दिली आहे. त्यांनी कोर्टात याचिका दाखल केली आहे. त्यांनी कोर्टाकडून स्टे ऑर्डर मिळविली असून कोर्टाने "जैसे थे" ऑर्डर दिली आहे. श्री.तायप्पा कलाप्पा कोळी हे आरोग्य सेवक पुरूष या पदावर कार्यरत होते, त्यांनी प्रस्ताव सादर केलेला नाही. अगोदर ते शिक्षण विभागात कार्यरत होते नंतर त्यांची नियुक्ती आरोग्य विभागात झाली आहे. जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासंदर्भात सन २०१२ मध्ये त्यांना नोटीस देण्यात आलेली होती. त्यांनी आता सोलापूर समितीकडे प्रस्ताव सादर केल्याचे कळविले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १८ मे २०१३ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार दिनांक ३१ जुलै, २०१३ या तारखेपर्यंत अनुसूचित जमातीचे जात वैधता प्रमाणपत्र सादर न करणा-या कर्मचा-यांनी ते ज्या जात प्रवर्गाचे आहेत त्या प्रवर्गाचे जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक होते, दुसरे असे आहे की, ३ जून २०१३ मध्ये ज्या सूचना दिलेल्या आहेत या सूचनांनुसार प्रस्ताव दाखल करून शासनाकडे तशी माहिती द्यावयाची आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

समितीने यावर, आपण दिलेले उत्तर समर्पक नाही, दिनांक १८ मे २०१३ च्या शासन निर्णयानुसार कारवाई होणे अपेक्षित आहे, नियुक्ती देत असताना जात वैधता प्रमाणपत्र सादर करावयास पाहिजे. असे प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्यांना सहा महिन्याची मुदत देण्यात येते. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही तर त्याची सेवा तातडीने खंडित करणे अपेक्षित आहे. संबंधित कर्मचा-याची नियुक्ती सन २००१ मधील असून त्याने आता सोलापूर समितीकडे प्रस्ताव सादर केल्याचा ई-मेल आपणाला मिळाला असे आपण सांगत आहात. या कर्मचा-यांवर नियमानुसार कारवाई करून तसा अहवाल समितीला १५ दिवसात सादर करावा असे निर्देशित केले असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार त्यांना एक अंतिम नोटीस देणे आवश्यक आहे, मी समितीला नम्रपणे सांगू इच्छितो की, यामध्ये अक्षम्य विलंब झालेला असल्याने मी स्वतः जातीने लक्ष घालतो आणि सर्व

प्रकरणांमध्ये दिनांक १८ मे, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार जी कारवाई करता येईल ती पुढील ८ दिवसात केली जाईल. श्रीमती पद्मा इंगळे, श्री. तायप्पा कलाप्पा कोळी व श्री. सुनिल साबळे या तिन्ही प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात येईल असे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी आश्वासित केले.

**बिंदू नामावली :-**

समितीने, जिल्हा परिषदेतील विविध विभागातील संवर्गनिहाय पदांची बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी दिनांक ९ ऑक्टोबर, २०११ नंतर सहायक आयुक्त (मावक) यांच्याकडून का करण्यात आलेली नाही याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, जिल्हा परिषदेमध्ये एकूण ६४ संवर्ग आहेत. सन २००९ नंतर सप्टेंबर, २०१५ मध्ये त्यांनी सहायक आयुक्त कार्यालयाला नोंदवही पाठविली होती. दर तीन वर्षानी बिंदूनामावलीची तपासणी करून घेणे अपेक्षित होते. स्थापत्य अभियांत्रिकी सहायक संवर्गाची बिंदू नामावली सन २००५ मध्ये तपासणी झालेली आहे. सन २००५ नंतर दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी बिंदू नामावली नोंदवही सादर केली होती. त्यामध्ये त्रुटी असल्यामुळे ती परत पाठविण्यात आली आहे. दिनांक १५ जून, २००५ पूर्वी स्थापत्य अभियांत्रिकी सहायक हे पद समावेशनामध्ये असल्यामुळे बिंदू नामावली ठेवली नव्हती. सरळसेवेची भरती केल्यामुळे आता बिंदू नामावली ठेवली आहे. कनिष्ठ अभियंत्यांची बिंदू नामावली नोंदवही दिनांक १३ मार्च, २०१५ रोजी सादर केली. काही पदे रुपांतरित करण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी बिंदू नामावलीची अडचण नाही ती पदे भरण्यात आली आहेत, बिंदू नामावली तपासणीसाठी दिनांक १३ मार्च २०१५ रोजी पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे, त्या प्रस्तावात काही त्रुटी आढळून आल्यामुळे सदर त्रुटींची पूर्तता करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे आलेला आहे. त्रुटींची पूर्तता करून मागासवर्गीय कक्षाकडे पुन्हा प्रस्ताव सादर करून एक महिन्यात बिंदू नामावली तपासून घेण्यात येईल.

यावर समितीने, गवंडी व वाहन चालक ही पदे भरताना जिल्हा परिषदेतर्फे चुका झालेल्या आहेत, त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी मिळाले नसले तरी दुस-या प्रवर्गातील कर्मचारी भरता येत नाहीत. असे कर्मचारी भरले तर काही संवर्गावर मोठ्या प्रमाणात अन्याय होऊ शकतो. वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदे वर्षानुवर्षे रिक्त ठेवणे योग्य नाही, त्यामुळे आदिवासी लोकांवर अन्याय होत आहे. यासाठी सर्व पदांची बिंदू नामावली वेळच्यावेळी तपासणे आवश्यक आहे. याबाबत काय कार्यवाही करण्यात येणार आहे असे विचारले असता मागासवर्गीय कक्षाकडून एक महिन्याच्या आत सर्व पदांची बिंदू नामावली तपासून समितीला तसा अहवाल सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले.

**विविध योजनांवर करावयाचा खर्च :-**

जिल्हा परिषद कार्यालयातील यंत्रणानिहाय आदिवासी उपयोजना क्षेत्रात कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या, या योजनेचे निकष काय होते ? तसेच, सन २०१२-१३ ते २०१४-१५ मध्ये यंत्रणानिहाय विभागास एकूण किती निधी प्राप्त झालेला आहे व त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला व झालेल्या खर्चात

कोणकोणती कामे पूर्ण झालेली आहेत ? याबाबत समितीला माहिती देण्याबाबत सांगितले असता जिल्हा परिषदेतील विविध विभागांनी समितीस खालीलप्रमाणे माहिती दिली.

**समाजकल्याण विभाग :-**

सन २०१२-१३ मध्ये टीएसपी क्षेत्रासाठी २ लाख व ओटीएसपी क्षेत्रासाठी ४ लाख रुपये निधी दिला गेला. त्यातून शिक्षण व परीक्षा शुल्क देण्यात आले आहे. सन २०१३-१४ मध्ये टीएसपी क्षेत्रासाठी २.५ लाख व ओटीएसपी क्षेत्रासाठी ६ लाख असे एकूण ८.५ लाख रुपये शिक्षण व परीक्षा शुल्क देण्यात आले. सन २०१४-१५ मध्ये टीएसपी क्षेत्रासाठी ३ लाख व ओटीएसपी क्षेत्रासाठी ७ लाख असे एकूण १० लाख रुपये देण्यात आले. या तीनही वर्षाची रक्कम खर्च झाली आहे. सन २०१२-१३ मध्ये ६४५ विद्यार्थी, सन २०१३-१४ मध्ये ८०६ विद्यार्थी व सन २०१४-१५ मध्ये ९६७ विद्यार्थ्यांना लाभ दिला आहे. यासाठी लाभार्थी अनुसूचित जमातीचा लाभार्थी असला पाहिजे, उत्पन्नाच्या दाखल्याची अट नाही. शिक्षण शुल्काचे दर शासनाने ठरवून दिले आहेत व परीक्षा शुल्क बोर्डाच्या फी नुसार द्यायची आहे. दिनांक १३ जुलै, १९९६ चा शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार पहिली ते दहावीच्या वर्गातील आदिवासी समाजाच्या सर्व विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो. विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असला पाहिजे, पालकाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख असावे व ते सक्षम प्राधिका-यांनी प्रमाणित केलेले असावे. शासनाने विहित केलेल्या स्वरुपात अर्ज केलेला असावा.

**कृषि विभाग :-**

सन २०१२-१३ मध्ये टीएसपी क्षेत्रासाठी ६५ लाख व ओटीएसपी क्षेत्रासाठी ४५ लाख रुपयांची तरतूद होती. सन २०१३-१४ मध्ये टीएसपी क्षेत्रासाठी १.१९ कोटी व ओटीएसपी क्षेत्रासाठी ५३.४४ लाख रुपयांची तरतूद होती. सन २०१४-१५ मध्ये टीएसपी क्षेत्रासाठी १.५३ कोटी व ओटीएसपी क्षेत्रासाठी ६८.७८ लाख रुपयांची तरतूद होती. आदिवासी लाभार्थ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत जमीन सुधारणा, कृषी निविष्ठा, नवीन विहीर, जून्या विहिरीची दुरूस्ती, शेततळे, बैलगाडी, बैलजोडी/रेडे जोडी, परसबाग, सुधारित पीक संरक्षक कृषी अवजारे, पीव्हीसी पाईप, पंपसंच, तुषार/ठिबक सिंचन इ. १३ बाबींचा लाभ दिला जातो. लाभार्थ्यांच्या गरजेनुसार जमीन सपाटीकरण केली जाते. जुन्नर तालुक्यामध्ये सन २०१२-१३ मध्ये १३ लाभार्थ्यांचे लक्ष्य साध्य केले आहे. त्यासाठी जमीन सुधारणेवर रु. ०१,७०,४१७ खर्च झाले. लाभार्थ्याच्या शेतामध्ये काम पूर्ण झाल्यानंतर केलेल्या कामाचे मोजमाप राज्य शासनाला कळविण्यात येते. यासाठी कृषी विभागाच्या राज्यस्तरीय अधिकां-याकडून तांत्रिक बाजू तपासली जाते. त्याचे रेकॉर्डिंग करून नंतर खर्च केला जातो. टीएसपी अंतर्गत अनुसूचित जमातीच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासनाच्यावतीने योजना आखलेल्या आहेत. यामध्ये लाभाचा क्वांटम ठरलेला आहे. शेतक-यांनी मागणी केल्यानुसार लाभ दिला जातो.

यावर प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात पीव्हीसी पाईप वाटप केले जातात. जिल्हा परिषद सुद्धा पीव्हीसी पाईप पुरविण्याची योजना राबविते. जिल्हा परिषदेकडे आलेल्या निधीतून चांगला लाभ लाभार्थ्यांना देण्यात यावा. आधुनिक शेतीची अवजारे देण्याची योजना राबविण्याची समितीने सूचना केली असता प्रकल्प अधिका-यांबरोबर समन्वय साधून ते नक्की कोणती योजना राबविणार आहेत आणि जिल्हा परिषद कोणती योजना घेणार आहे हे ठरविता येईल असे मुख्य कार्यकारी अधिका-यांनी नमूद केले.

**बांधकाम विभाग :-**

समितीने, बांधकाम विभागास सन २०१२ पासून किती निधी प्राप्त झाला आहे व त्यानुषंगाने कोणत्या प्रकारची कामे पूर्ण केली आहेत असा प्रश्न केला असता कार्यकारी अभियंत्यांनी विशद केले की, सन २०१२-१३ मध्ये ४५७.८१ लाख रुपये उपलब्ध झाले होते, त्यापैकी ३९१.९५ लाख रुपये खर्च झाले. सन २०१३-१४ मध्ये २१०.८६ लाख रुपये प्राप्त झाले, त्यापैकी २०४.८८ लाख रुपये खर्च झाले. सन २०१४-१५ मध्ये १६१.४६ लाख रुपये प्राप्त झाले, त्यापैकी ११३.८० लाख रुपये खर्च झाले. यामध्ये डांबरीकरणाची व खडीकरणाची ६६ कामे पूर्ण झाली आहेत तसेच किमान गरजा कार्यक्रमांतर्गत २०१२-१३ मध्ये १३६.७८ लाख रुपये प्राप्त झाले व ५०.२३ लाख रुपये खर्च झाले. सन २०१३-१४ मध्ये १७२.७९ लाख रुपये प्राप्त झाले व ११०.२८ लाख रुपये खर्च झाले. सन २०१४-१५ मध्ये १५७.३६ लाख रुपये प्राप्त झाले व १५४.५३ लाख रुपये खर्च झाले. पूर्ण झालेल्या कामांची संख्या ३७ आहे. जिल्हा परिषदेला प्रत्येक वर्षी जो निधी येतो तो दोन वर्षात खर्च करण्याची मुभा आहे.

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेमध्ये सन २०१२-१३ मध्ये उपयोजना क्षेत्रांतर्गत १३.७२ लक्ष रुपये प्राप्त झाले होते, त्यापैकी ४.९७ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१३-१४ मध्ये १३२.१८ लक्ष रुपये प्राप्त झाले होते, त्यापैकी १०७.४७ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१४-१५ मध्ये ९६.२८ लक्ष रुपये प्राप्त झाले होते, त्यापैकी ८०.६५ लक्ष रुपये खर्च करण्यात आले आहेत. या कामांसाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त झालेला आहे. हा निधी दोन वर्षापर्यंत खर्च करता येतो. सन २०१३-१४ चा निधी सन २०१४-१५ मार्च पर्यंत खर्च करता येतो. या कालावधीत १ कोटी रुपयांचा निधी मिळाला असून ३० लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१५ च्या सुरुवातीपासून निधी खर्च करण्यात येत आहे.

**ग्रामीण पाणीपुरवठा विभाग :—**

समितीने, आदिवासी व आदिवासी क्षेत्राबाहेरील योजनांवर सन २०१२ ते २०१५ मध्ये किती निधी खर्च करण्यात आलेला आहे व किती कामे पूर्ण करण्यात आली आहेत असे विचारले असता कार्यकारी अभियंता (ग्रापापु) यांनी विदित केले की, सन २०१२ ते २०१५ या कालावधीत २० पाणीपुरवठा योजना

पूर्ण करण्यात आल्या आहेत. या योजनांवर जवळपास एकूण १९४ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. दिनांक १३ जुलै, २०१५ च्या शासन निर्णयानुसार कोणतीही नवीन पाणीपुरवठा योजना घेण्यात येऊ नये असे नमूद केले आहे. ज्या योजनांना १५ ते २० वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला आहे त्या योजनांना समावेश नवीन आराखडे व प्रस्ताव सादर करतांना करण्यात यावा. ज्या जुन्या पाणीपुरवठा योजना आहेत त्या आता राष्ट्रीय पेयजल योजनेतून घेण्यात याव्यात यासाठी नव्याने आराखडे तयार करावेत. या योजनेसाठी राज्य शासन व केंद्र शासन ५०-५० टक्के निधी देणार आहे.

**लघु पाटबंधारे विभाग :-**

समितीने, सन २०१२ ते २०१५ या कालावधील लघुपाटबंधारे विभागात कोणती कामे घेण्यात आली व त्यावर किती रुपये खर्च करण्यात आले आहेत अशी विचारणा केली असता कार्यकारी अभियंत्यांनी नमूद केले की, छोटे पाटबंधारे विभागाअंतर्गत सन २०१२-१३ मध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत १९.५९ लक्ष निधी देण्यात आला असून संपूर्ण निधी खर्च झालेला आहे. सन २०१३-१४ मध्ये २५.९८ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला असून संपूर्ण निधी खर्च झालेला आहे. सन २०१४-१५ मध्ये १२१.८२ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला असून त्यापैकी रुपये १४.५७ इतका निधी खर्च झालेला आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत वळण बंधारे देवळे चिंचेवाडी, ता. जुन्नर, वळणबंधारा तळेरान, उन्हाळवस्ती,(जुन्नर) वळणबंधारा अंजनावळे, ता. जुन्नर, पाझर तलाव औदर टपालवाडी, ता. खेड, साठवण बंधारा बोरघर, ता. आंबेगाव, पाझर तलाव तिरपाड, चांभारमळा, ता. आंबेगांव, साठवण बंधारा आंबोली, ता. जुन्नर या ठिकाणी कामे करण्यात आलेली आहेत. घाटघर येथे आदर्श गाव योजना सुरू आहे.

**पशुसंवर्धन विभाग :-**

समितीने, सन २०१२-१३ मध्ये पशुसंवर्धन विभागाला किती निधी प्राप्त झाला व किती निधी खर्च करण्यात आला आहे ? अशी विचारणा केली असता पशुसंवर्धन अधिका-यांनी सन २०१२-१३ मध्ये टीएसपीअंतर्गत २० लाख २० हजार रुपये उपलब्ध झाले होते. ओटीएसपीअंतर्गत ६० लाख रुपये उपलब्ध झाले होते हा संपूर्ण निधी खर्च करण्यात आलेला आहे. या निधीतून पशुवैद्यकीय दवाखाने, पशु प्रथमोपचार केंद्र बांधकाम, दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा करणे, दुधाळ जनावरांच्या गटांचा पुरवठा करणे, अनुसूचित जमातीच्या लोकांना शेळ्या व मेंढ्यांचे वाटप करणे इ. कामे केली असल्याचे समितीस अवगत केले.

**महिला व बाल कल्याण विभाग :—**

समितीने, सन २०१२ ते २०१५ या कालावधीत या विभागासाठी किती निधी प्राप्त झाला व किती निधी कोणत्या कामांसाठी खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत माहिती देण्यास सांगितले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, सन २०१२-१३ मध्ये टीएसपीअंतर्गत १० लाख रुपये व ओटीएसपीअंतर्गत ५ लाख रुपये प्राप्त झाले होते, हे सर्व १५ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१३-१४ मध्ये टीएसपीसाठी २० लाख रुपये व ओटीएसपीसाठी १० लाख रुपये अशा प्रकारे ३० लाख रुपये प्राप्त झाले होते, ते सर्व रुपये खर्च करण्यात आले आहेत. सन २०१४-१५ मध्ये टीएसपीअंतर्गत २० लाख रुपये व ओटीएसपीअंतर्गत १० लाख रुपये असे ३० लाख रुपये प्राप्त झाले होते, या वर्षात निधी खर्च करण्यात आलेला नाही. या वर्षातील खर्च प्रस्तावित आहे. सन २०१२ ते २०१५ या कालावधीमध्ये एकूण ३६६ अंगणवाड्यांना इमारती नव्हत्या त्यापैकी आतापर्यंत २६२ अंगणवाड्यांना इमारती आहेत व १०४ अंगणवाड्यांना इमारती नाहीत, विभागास उपलब्ध होणा-या निधीमधून दरवर्षी ३० ते ३२ अंगणवाड्यांच्या इमारती बांधण्यात येतात, त्यामुळे पुढील तीन वर्षात १०४ अंगणवाड्यांच्या इमारती बांधण्यात येतील. कोणतीही अंगणवाडी आता उघड्यावर सूरू नाही. ज्या अंगणवाड्यांना इमारती बांधून झाल्या नाहीत त्या ग्रामपंचायत कार्यालय किंवा शाळेच्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरूपात सुरु आहेत. अती तीव्र व कमी तीव्र वजनाची ८५८ तर तीव्र वजनाची १३३ व सर्वसामान्य ८६०० बालके आहे, तीव्र व कमी तीव्र वजनाच्या बालकांबाबत प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत उपचार करण्यात येत आहेत. ४५९६ अंगणवाड्यांमध्ये शून्य ते सहा वर्ष वयाची १ लाख १९ हजार बालके आहेत यासाठी ३६६ लाख रुपये निधी मिळाला होता. तीव्र कमी वजनाची व अती तीव्र वजनाच्या बालकांसाठी योजना राबविण्यात आलेली आहे. मावळ तालुक्यामध्ये २३९ बालके होती, यापैकी ३०४ मुले आता सर्वसामान्य श्रेणीमध्ये आली असून ३४ मुले शिल्लक आहेत, बालरोग तज्ज्ञ यांच्याकडून त्यांची नियमित तपासणी करून उपचार करण्यात येत आहेत. पुणे जिल्ह्यामध्ये लायन्स क्लब इंटरनॅशनल सेंटर तर्फे कुपोषित मुलांसाठी उपचार करण्यात येत असून २०८७ मुलांना सर्व सामान्य श्रेणीमध्ये आणण्यास जिल्हा परिषदेला यश आले आहे. आता फक्त १० टक्के मुले यामध्ये राहिली असून त्यांना सर्वसामान्य श्रेणीत आणण्यासाठी लायन्स क्लब इंटरनॅशनल सेंटरतर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत, या योजनेमध्ये शासनाचा निधी खर्च करण्यात येत नाही.

**स्वच्छ भारत मिशन :—**

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, जिल्ह्यात सन २०१२-१३ मध्ये ६ लाख ४९ हजार कुटुंबे होती. त्यापैकी आता पर्यंत ५ लाख ४० हजार कुटुंबांना शौचालये बांधून दिलेली आहेत. साधारणपणे ९८ हजार कुटुंबे बाकी आहेत. वेल्हा आणि भोर हे दोन्ही तालुके हागणदारी मुक्त करण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. आदिवासी भागातील २४,००२ कुटुंबांकडे वैयक्तिक शौचालये आहेत. जी १४,१०६ कुटुंबे राहिलेली आहेत, त्यांच्याकडे वैयक्तिक शौचालय नाही. त्यासाठी रोटरी इंटरनॅशनल यांनी आम्हाला

सहकार्य केलेले आहे. ३२ हजार रुपयांमध्ये शौचालयाचे बांधकाम पूर्ण होत नाही. यामध्ये काही रोटरी इंटरनॅशनलचा हिस्सा, तर काही लाभार्थ्यांचा हिस्सा अशा प्रकारे शौचालय बांधकामाचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे.

**जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा या** विभागाच्या संदर्भात सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये जिल्ह्याला घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले नव्हते. त्यावेळी टीएसपीअंतर्गत कोणत्याही प्रकारची तरतूद झालेली नाही. सन २०१२-१३ मध्ये ३४ लाख ७५ हजार रुपये तरतूद उपलब्ध होती. त्यातून १११ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले असून तो निधी पूर्णपणे खर्च झालेला आहे अशी माहिती समितीस दिली.

**अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबवावयाच्या घरकुल योजना :**

समितीने, घरकुलांच्या संदर्भात समितीला माहिती देण्याबाबत सांगितले असता, समितीस विदित करण्यात आले की, सन २०१२-१३ मध्ये २५८५ घरकुलांचे उद्दिष्ट होते. अनुसूचित जमातीसाठी ४७२ घरकुले मंजूर केली होती. सन २०१३-१४ मध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेला उद्दिष्ट प्राप्त झाले नव्हते. परंतु, विभागाकडे पूर्वीचा इंदिरा आवास योजनेचा निधी शिल्लक होता. त्यातून काही घरकुले मंजूर केली. सन २०१४-१५ मध्ये घरकुलांचे उद्दिष्ट नव्हते आणि निधीही शिल्लक नव्हता. सन २०१५-१६ मध्ये जून महिन्यात १४३ घरकुलांचे उद्दिष्ट प्राप्त झाले होते. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यात ४९४० घरकुलांचे सुधारित उद्दिष्ट आलेले आहे. डिसेंबर अखेर ९३० घरकुले मंजूर केली होती. त्यापैकी अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या लाभार्थ्यांची संख्या ७६ आहे. जेवढ्या अनुसूचित जमाती लाभार्थ्यांचे प्रस्ताव आले ते मंजूर केलेले आहेत.

पुणे जिल्ह्यातील दारिद्र्य रेषेखालील एकूण कुटुंब संख्या १ लाख २२ हजार आहे. दारिद्र्य रेषेखालील ४३ हजार कुटुंबांना घरकुले बांधून दिलेली आहेत. ७५ हजार कुटुंबांना घरकुलाचा लाभ देणे अपेक्षित होते. ५७ हजार घरकुले बांधून दिलेली आहेत. उर्वरित १८ हजार घरकुलांसाठी जागा नसल्याने शासनाने घरकुलासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, असा आम्ही प्रस्ताव सादर केला होता. सन २०११ मध्ये सुप्रिम कोर्टाने निर्णय दिला आहे की, खाजगी लोकांना सरकारी जागा देऊ नये. म्हणून जागा देता येत नाही. पंडित दिनदयाल उपाध्याय योजनेअंतर्गत घरकुलासाठी ग्रामीण भागात ५० हजार रुपये आणि शहरी भागात २ लाख रुपये दिले जातात. इंदिरा आवास योजनेअंतर्गत डोंगराळ भागात घरकुल बांधण्यासाठी ७५ हजार रुपये अनुदान दिले जाते. त्यामध्ये लाभार्थी हिस्सा ५ हजार रुपये आहे. परंतु, शहरी भागातून रेती, सिमेंट डोंगराळ भागात नेण्यासाठी खर्चात वाढ होते.

यावर समितीने जास्तीत-जास्त लोकांना घरकुलाचा लाभ द्यावा तसेच, २०-२५ वर्षापूर्वी ज्यांना घरकुलाचा लाभ दिलेला आहे त्यांना पुन्हा घरकुलाचा लाभ द्यावयाचा किंवा कसे या संदर्भात शासनाकडून मार्गदर्शन घ्यावे. २० वर्षापूर्वी लोकांना घरकुलाचा लाभ दिलेला आहे. त्यावेळी घरकुलासाठी २७,५००/- रुपये मिळत होते. ती घरकुले जुनी झालेली आहेत. त्यामुळे आम्हाला नवीन घरकुलाचा लाभ द्यावा, अशी अनेक लोकांची मागणी असल्याने तसेच घरकुलाच्या अनुदानामध्ये वाढ करणे यासंदर्भात समिती शासनाला शिफारस करेल असे समितीने आश्वासित केले.

**विभागीय सचिवांची साक्ष :–**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने दिनांक २३ ते २६ फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत पुणे जिल्हा परिषदेस दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने दिनांक १९ जून, २०१८ रोजी समितीने ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित केली होती.

**बिंदू नामावली :-**

सदर साक्षीच्यावेळी समितीने प्राथमिक शिक्षक व शिक्षण विभागांतर्गत उर्वरित संवर्गाची बिंदू नामावली यापूर्वी केव्हा तपासण्यात आली होती तसेच केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक पदाची बिंदुनामावली सन २०११ नंतर केव्हा तपासून घेण्यात आली याबाबत विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, उप शिक्षक पदाची बिंदू नामावली दिनांक ३० मे, २०१७ अन्वये मागास वर्ग कक्षाकडून तपासून घेण्यात आली आहे. केंद्र प्रमुख पदाची बिंदू नामावली दिनांक १ नोव्हेंबर, २०११ अन्वये तपासून घेण्यात आली आहे. सरळसेवा विस्तार अधिकारी (शिक्षण) पदाची बिंदू नामावली दिनांक १९ एप्रिल, २०१८ रोजी तपासून घेण्यात आली आहे. केंद्र प्रमुख व मुख्याध्यापक पदाची बिंदू नामावली सन २०११ नंतर तपासली नाही, ही वस्तुस्थिती आहे. मागील वर्षी सर्व जिल्ह्यांनी शिक्षण विभागातील पदांच्या बिंदू नामावली तपासणीचा आढावा घेतला. त्यावेळी केवळ ८ ते ९ जिल्ह्यानी बिंदू नामावली प्रमाणित करुन घेतल्याचे आढळून आले होते. त्यानंतर सर्व जिल्ह्यांना सूचना देऊन बिंदू नामावली तपासणी करून घेण्याचे निदेश दिले असता मागील १ वर्षामध्ये बिंदू नामावली तपासून घेण्याची संख्या ७-८ जिल्ह्यावरुन २५ ते २६ जिल्ह्यांपर्यंत पोहोचली आहे. शिक्षक संवर्गासाठी बिंदू नामावली प्रमाणित करून घेणे हा विषय फार कठीण आहे. अनेक शिक्षकांना पूर्वी कोणत्या बिंदूवर नियुक्ती देण्यात आली होती, हा प्रश्न अनेक जिल्ह्यांमध्ये निर्माण झाला होता. काही शिक्षकांना सन १९८० मध्ये शिक्षक पदावर नियुक्ती देण्यात आली होती ते आदेश त्यांना मिळून येत नव्हते. त्यामुळे त्यांना कोणत्या बिंदूवर दर्शवावे, असा प्रश्न ५ ते ६ जिल्ह्यांमध्ये निर्माण झाला होता. काही दिवसांपूर्वी राज्यातील शिक्षकांच्या एकतर्फी बदलीची कार्यवाही करण्यात आली. त्यावेळी ७-८ जिल्ह्यांची बिंदू नामावली प्रमाणित नसल्यामुळे तेथे शिक्षकांना एकतर्फी बदलीची कार्यवाही करता आली नाही.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस पुढे असेही विशद केले की, समितीचा दौरा झाला होता त्यावेळी जिल्हा परिषदेतील पदांच्या २६ बिंदू नामावल्या तपासून घेण्याची कार्यवाही प्रलंबित होती. समितीच्या दौ-यानंतर खास मोहिम राबवून २६ पैकी १४ पदांच्या बिंदू नामावल्या तपासून घेण्यात आल्या आहेत. १२ पदांच्या बिंदू नामावल्या तपासून घेणे बाकी आहे. यामध्ये मुख्यत्वे पदोन्नतीच्या बिंदू नामावल्या आहेत. शासनाकडून पदोन्नतीच्या संदर्भात वेगवेगळ्या प्रकारचे आदेश प्राप्त झाले होते. मागास वर्ग कक्षाकडून पदोन्नतीच्या पदांच्या बिंदू नामावल्या तपासून देण्यात येत नव्हत्या. माननीय सर्वोच्च न्यायालयाने पदोन्नतीच्या संदर्भात दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने शासनाने एक समिती गठीत केली आहे. आता मागास वर्ग कक्षाकडून उक्त निर्णयाच्या अधिन राहून पदोन्नतीची बिंदू नामावली तपासून देण्याची कार्यवाही सुरू करण्यात येईल, असे मला वाटते. समितीच्या दौ-यानंतर प्रलंबित बिंदू नामावल्यांपैकी ५० टक्के बिंदू नामावल्या तपासून घेण्यात आल्या आहेत. मध्यंतरीच्या काळामध्ये मागास वर्गीय कक्षाकडून पदोन्नतीच्या पदांची बिंदू नामावली तपासणी प्रक्रिया थांबविण्यात आली होती. सदरहू प्रक्रिया उक्त शासन निर्णयानंतर सुरु होणे अपेक्षित होते. अनुसूचित जमातीच्या संवर्गामध्ये जे कर्मचारी लागलेले आहेत, ज्यांचे दावे अवैध आहेत ते सुप्रीम कोर्टात गेले होते. त्या अनुषंगाने सुप्रीम कोर्टाने दिनांक ६ जुलै २०१७ रोजी आदेश पारित केले होते. सदरहू आदेशाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी आणि शासनाला शिफारसी करण्यासाठी दिनांक ५ जून २०१८ रोजीच्या आदेशान्वये माननीय आदिवासी विकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने एक समिती नेमलेली आहे. या समिती नेमण्याच्या निर्णयाला नागपूर उच्च न्यायालयाने दिनांक ११ जून २०१८ रोजी स्थगिती दिलेली आहे.

यावर समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले की, फेब्रुवारी, २०१६ मध्ये समितीने पुणे जिल्ह्याला भेट दिली होती. सन २०१७ च्या दरम्यानच्या काळात विलंब होण्याचे कारण काय आहे. २६ पैकी १४ पदांच्या बिंदू नामावली तपासणी पूर्ण केली असून १२ पदांची बिंदू नामावली अपूर्ण आहे. माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये समितीने भेट दिल्यानंतर आज दोन वर्ष पूर्ण होत आहेत. समितीस तत्कालीन अधिका-यांनी सांगितले होते की, याची पूर्तता करून दोन महिन्यात अहवाल सादर करतो. माहे फेब्रुवारी, २०१६ पासून या प्रकरणांमध्ये कार्यवाही झाली नाही, ही वस्तुस्थिती आहे. १२ पदांची प्रकरणे अपूर्ण आहेत. मध्यंतरीच्या काळात हे प्रकरण सादर व्हायला पाहिजे होते ते झालेच नाही. दिनांक ४ ऑगस्ट २०१७ नंतर या सर्व घडामोडी झालेल्या आहेत. दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ पर्यंत विलंब झालेला आहे. केवळ प्रशासनाच्या चुकांमुळे दिरंगाई झालेली आहे. आता तर नवीन आदेश आहेत, परंतु पदोन्नतीची प्रक्रिया वेळीच

राबविली असती तर पदोन्नती वेळेत झाल्या असत्या. नवीन आदेश येण्यापूर्वी जे पात्र होते ते संधीस मुकले आहेत. ही वस्तुस्थिती लक्षात आणून दिली असता ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी, समितीने भेट दिल्यानंतर मध्यंतरीच्या दीड वर्षांच्या काळात कोणी कोणी काय काय कारवाई केली, त्यांनी प्रकरण सादर केले होते काय, त्यांनी काही त्रुटी काढल्या होत्या का, त्याचा अहवाल मागवून समितीला सादर करण्यात येईल तसेच विलंबाबाबत जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

समितीने जे कर्मचारी पदोन्नतीस पात्र होते त्यांना सहा महिन्यांपूर्वी पदोन्नती न देता विलंब करणा-या संबंधितांवर कोणती कारवाई करणार आहात दिनांक ६ जुलै २०१७ रोजीच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आपण कारवाई करणार आहात काय असा प्रश्न केला असता जे जे अधिकारी त्यावेळी होते याबद्दल जिल्हा परिषदेने शहानिशा करावी व कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेने अधिका-यांची नावे कळवावीत. जर चुकीचे स्वरूप असेल किंवा काहीच केले नसेल तर त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल, असे सचिवांनी समितीस विदित केले.

सचिवांनी समितीस असेही अवगत केले की, एखाद्या प्रकरणी अडचण आली तर न्यायालयाचा अवमान तर होत नाही ना, याबाबत विधि व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येतील. त्यांच्या अभिप्रायानुसार जितक्या कर्मचा-यांना पदोन्नती देणे शक्य होईल त्यानुसार पुढील तीन महिन्यांत सर्व कॅटेगिरीच्या १०० टक्के पदोन्नत्या पूर्ण करण्यात येतील.

**कर्मचारी भरती, बढती व आरक्षण :-**

बिगर आदिवासी क्षेत्रातील आरोग्य सेवक (महिला) २ पदे रिक्त असल्याने आदिवासी क्षेत्रातील उमेदवारांच्या प्रतिक्षा सूचीमधून भरणेबाबत शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे काय. सन २०१५ मध्ये आरोग्य सेवक (पुरुष) पदाचे उमेदवार उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत आदिवासी क्षेत्रातील उमेदवार प्रतिक्षा सूचीमधून भरण्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झाले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी विदित केले की, निवड सूचीची कालमर्यादा संपलेली होती म्हणून त्याचा वापर करता आला नाही. सन २०१५ मध्ये आरोग्य सेवक (पुरुष) २ पदे रिक्त आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये शासनाचा आदेश नसल्यामुळे पदभरती करता आली नाही. गेल्या दोन वर्षांपासून भरतीची प्रक्रीया सुरू होती, परंतु भरतीला स्थगिती दिली. जिल्हा परिषदेचा पूर्ण आकृतीबंध नव्याने मंजूर करून घेण्यासाठी उशीर झाला आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांनी आरोग्य विभागातील पदे भरण्यासाठी परवानगी देण्याचे मान्य केले आहे. त्यानुसार सुमारे ६७०० पदे भरण्याची कार्यवाही ऑनलाईन सुरू केली आहे सन २०१८ चे पावसाळी अधिवेशन संपल्यानंतर जवळपास १२ हजार पदांची भरती प्रक्रिया पार पाडली जाणार आहे.

**जात प्रमाणपत्र पडताळणी :**

समितीने ,न्यायालयाच्या आदेशान्वये कामावर घेतलेले ०८ कर्मचारी सेवेत केव्हा रुजु झाले आहेत व सदर कर्मचा-यांच्या न्यायालयाच्या आदेशात काय नमूद करण्यात आले आहे. सदर कर्मचा-यांची प्रकरणे जात पडताळणीसाठी कोणत्या समितीकडे पाठविण्यात आलेली आहेत व त्यावर जात पडताळणी समितीने निर्णय घेतला आहे काय, असा प्रश्न केला असता सचिवांनी विदित केले की, अनुसूचित जमातीमध्ये ज्या उमेदवारांची नियुक्ती झालेली असेल आणि त्यांच्याकडे जात प्रमाणपत्र नसेल तर त्यांना सेवेतून कमी केले पाहिजे, असे माननीय सर्वोच्य न्यायालयाचे आदेश आहेत. सदरहू ८ प्रकरणांसाठी जिल्हा परिषद पुणे यांनी विशेष वकिलांची नेमणूक केली पाहिजे. सदरहू प्रकरणे लवकरात लवकर बोर्डावर आणण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात मा. न्यायालयाला तात्काळ निर्णय देण्यासाठी विनंती करावी. तसेच माननीय सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत, ते देखील निदर्शनास आणून देण्याची आवश्यकता आहे.

समितीने सन १९९५ पूर्वी आणि सन १९९५ त्यानंतर आपल्या विभागाने कोणती कार्यवाही केलेली आहे अशी विचारणा केली असता सचिवांनी नमूद केले की, सर्वांना जात प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेण्यासाठी नोटीसेस देण्यात आल्या होत्या. कृषि विभागात कार्यरत असणारे श्री. बागुल यांची नियुक्ती सन १९८९ मधील आहे. त्यांनी सन २००९ मध्ये जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज केला होता. सद्यःस्थितीत त्यांचे प्रकरण प्रलंबित आहे.

श्री. वेगरे यांचे एक प्रकरण आहे. यांची नियुक्ती सन १९९२ मधील आहे. त्यांनी सन २०१७ मध्ये जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज केला होता. श्री. गावडे यांची नियुक्ती सन १९९२ मधील आहे. त्यांनी सन २०१२ मध्ये जात प्रमाणपत्राची पडताळणी करण्यासाठी अर्ज केला होता. या केसेस १९९५ च्या पूर्वीच्या आहेत. सन १९९६ मधील एक केस आहे आणि त्यांनी २१ ऑक्टोबर, २०१५ रोजी अर्ज केलेला आहे. तीन वर्षांपासून ते जात पडताळणी समितीकडे प्रलंबित आहे. तसेच सन १९९८ मधील एक केस आहे आणि त्यांनी सन २००९ मध्ये अर्ज केलेला आहे. ते प्रकरणही प्रलंबित आहे. तसेच आणखी एक प्रकरण ७ जानेवारी, १९९५ मधील असून दिनांक ३० सप्टेंबर, २०१३ रोजी जात प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्यासाठी अर्ज केलेला आहे. श्रीमती कापसे यांचे ही प्रकरण प्रलंबित आहे.

**जिल्हा परिषदेचे अनुदानित व खाजगी शाळांवरील नियंत्रण :-**

समितीने खाजगी शाळांना जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून संच मान्यता देण्यात येते हे खरे आहे काय, ६४ शाळांची रोस्टर तपासणी पूर्ण झाली आहे काय ? खाजगी शाळांची रोस्टर तपासणी दर ३ वर्षांनी करण्यात येते काय, यावर शिक्षण विभागामार्फत कशा प्रकारे अंकुश ठेवण्यात येतो याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी विदित केले की, ७४ शाळा बंद होणे

अपेक्षित होते. पण मुले शाळाबाह्य होतील अशी भीती वाटल्यामुळे जिल्हा परिषदेने सर्वसाधारण सभेमध्ये अशी चर्चा केली की, पूर्ण ७४ शाळा बंद न करता ३ सदस्यांची एक समिती नेमावी. या समितीने काही शाळा निश्चित केल्यानुसार जवळपास २० ते २२ शाळा बंद केल्या आहेत बाकीच्या शाळांच्या संदर्भात एवढ्या निष्कर्षापर्यंत आलो आहोत की, १०-१५ मुले असतील आणि त्यांचे समायोजन केले तर त्यांना खूप लांब जावे लागेल. त्यामुळे आवश्यकता असेल तर जिल्हा परिषदेच्या निधीतून ती शाळा चालविण्यात येईल. पण ती शाळा बंद करणार नाही, असे जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेने ठरवले आहे. ७४ शाळा बंद करायला पाहिजे होत्या पण फक्त २५ शाळा बंद केल्या आहेत आणि बाकीच्या शाळा सरू आहेत. समायोजन केल्यामुळे मुलांना २ ते ३ किलोमीटर लांब जावे लागते त्यामुळे ते शाळेतच जात नाहीत, अशी परिस्थिती निर्माण होते. एक चांगली बाब अशी आहे की, वेल्हा तालुक्यामध्ये चांदेर नावाचे गाव आहे तिथे फक्त १ मुलगा आहे. त्याला शिकवण्यासाठीसुद्धा १ शिक्षक मोटर सायकलवर जातो. हॉस्टेल काढून सर्व मुलांना एकत्र करण्याचा विचार झाला होता. पण ती मुले कुटुंबाला जोडलेली असतात त्यामुळे ते घरापासून दूर येत नाहीत. जिथे व्यवस्थितपणे समायोजन होईल असे वाटले त्या ठिकाणच्या शाळा बंद केल्या आहेत आणि जिथे मुले शाळाबाह्य होतील असे वाटते तेथील शाळा बंद केल्या नाहीत.

यावर समितीने, जिल्हा परिषदेच्या अखत्यारितील ज्या अनुदानित शाळा आहेत अशा ब-याच शाळांना आपण जिल्हा परिषदेच्या माध्यमातून संच मान्यता देतो. परंतु त्यावर जिल्हा परिषदेचा अंकुश नसतो. पदोन्नती किंवा नोकरभरतीसाठी आपल्याकडे एखादी कल्पना आहे काय म्हणजे जेणेकरून आपल्याला त्याची अंमलबजावणी करता येईल. माध्यमिक शिक्षणाधिका-यांना मुख्यकार्यकारी अधिका-यांनी कितीही नोटीसा दिल्या तरी काळजी घेत नाहीत. शिक्षण विभागात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आहे. इंग्रजी किंवा मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळांना शिक्षणाधिकारी संच मान्यता देत असतात. समजा, एखाद्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांची संच मान्यतेची प्रकरणे येतात त्यावेळेस तेथील सर्व मराठी माध्यमाचे शिक्षक इंग्रजी माध्यमांना शिकवतात. मग त्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांचा काय दर्जा राहणार आहे ? त्यामुळे शिकवण्याची पद्धत व्यवस्थित होत नाही कारण ज्या क्षमतचे शिक्षक तिथे नेमायला पाहिजेत तसे होत नाही. पर्यायाने या ठिकाणी हजारो नाहीतर लाखो विद्यार्थ्यांचे नुकसान होते. आदिवासी विभागाच्या नामांकित शाळांना समिती भेट देते. पण शाळा आदिवासी विभागाच्या अंतर्गत येत नाहीत तर माध्यमिकच्या अंतर्गत येतात आणि माध्यमिक शिक्षण विभाग त्याला मान्यता देत असते. त्या शाळेला मान्यता देत असताना तिथे इंग्रजी माध्यमाचे एकही शिक्षक नसतात तरीदेखील त्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेला मान्यता मिळते. एखादा शाळेचा दर्जा असल्याचा नावाखाली केल्या जातात. पण प्रत्यक्ष तिथे जाऊन पाहिले तर इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मुलगा मराठी माध्यमाच्या शाळेत जाऊन शिकत असतो. यामुळे कोणत्याही शाळेचा दर्जा

राखला जात नाही आणि पर्यायाने त्यामध्ये मुलांचे नुकसान होते. जिल्हा परिषदेच्या अखत्यारीत येणा-या शाळांसाठी शिक्षण विभागाला सांगितले पाहिजे की, किमान संच मान्यता देताना त्या गुणवत्तेचे शिक्षक त्या ठिकाणी असले पाहिजेत असे मत मांडले असता सचिवांनी अवगत केले की, जितक्या एनईटी शाळा आहेत त्याचे धोरण शिक्षण विभाग तयार करते. नवीन प्रणाली तयार केलेली आहे त्यानुसार ग्रामविकास विभागाने ७ ते ८ हजार शिक्षक भरतीसाठी आम्ही पत्र पाठवलेले आहे. आता त्या भरतीमध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता शक्य वाटत नाही. बदली, भरती किंवा परीक्षा घेताना सर्व जागी संगणकीकरणाची प्रक्रिया सुरु आहे म्हणून 'पवित्र' या पोर्टलचा खूप मोठा फरक पडला आहे. सरल मान्यतेमध्ये मुलांची नावे लिहिली जातात आणि पूर्ण संच मान्यता ही सरलच्या डाटा एन्ट्रीच्या आधारे होते.

**आदिवासी उपयोजना व उपयोजना बाह्य निधीबाबत :**

यानंतर समितीने सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीत पाटबंधारे विभागाने उपयोजने अंतर्गत केलेल्या कामांसाठी किती निधी खर्च करण्यात आला व किती निधी अखर्चित राहिला एकूण ५४.७७ लाख रुपये निधी खर्च करण्यात आला. जिल्हा परिषदेस प्राप्त निधी २ वर्षामध्ये खर्च करण्याची परवानगी आहे. समितीने अनेक जिल्ह्यांना भेटी दिल्या त्यावेळी असे निदर्शनास आले आहे की, २ वर्षांत निधी खर्च करण्याची परवानगी असल्याने या आर्थिक वर्षातील कामे वर्ष संपत आल्यानंतर सुरू करण्यात येतात. त्यामुळे निधी साठवून ठेवण्याची पद्धत वाढत आहे, त्यामुळे कामे प्रलंबित राहतात. काही जिल्हा परिषदांची कामे तीन वर्षांपासून सुरू असून ती अद्याप सुरू असल्याचेही समितीच्या निदर्शनास आले आहे. त्यानंतर ४ थ्या अथवा ५ व्या वर्षी निधी अखर्चित राहिल्यामुळे शासन सदरी जमा करण्यात येतो. यामुळे कामाची अंदाजपत्रकीय किंमतही वाढत राहते. आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त निधी विकासाच्या कामांसाठी न वापरता बचत करुन ठेवण्यात येतो व त्यावर मिळणा-या व्याजातून जिल्हा परिषदमार्फत नवीन उपक्रम राबविण्यात येतात. अशी वृत्ती योग्य आहे काय अशी विचारणा केली असता सचिवांनी माहिती दिली. बाब केवळ टीएसपीच्या निधीसंदर्भात नव्हे तर अनेक योजनांच्या निधीसंदर्भात घडते. ब-याच योजनांचा निधी खर्च न करता बचत खात्यामध्ये ठेवण्यात येतो व त्यावर मिळणारे व्याज प्राप्त करण्यात येते. यावर्षी निधी प्राप्त झाल्यानंतर त्यामधून करावयाच्या कामाची निविदा प्रक्रिया पुढील वर्षांमध्ये करण्यात येते. त्यानंतर पुढील वर्षात निधी खर्च करण्यास मान्यता देण्याकरिता शासनास प्रस्ताव सादर करण्यात येतो. यामुळे वेगवेगळ्या जिल्हा परिषदेमध्ये सुमारे ५०० ते ६०० कोटी रुपये योजनांचा निधी पडून राहत असतो उक्त कारणास्तव शासनाने दिनांक ३१ मार्च, २०१८ रोजीपासून नवीन पद्धत सुरू केली आहे. या पद्धतीचा वापर सर्व योजनांसाठी करण्यात येणार असून टीएसपीसंदर्भातही अशा प्रकारचा निर्णय घेतला पाहिजे. नवीन पद्धतीनुसार कामासाठी निधी पाठविण्यात येणार नाही, केवळ संबंधित कामासाठी निधी मंजूर असे संगणक प्रणालीद्वारे लिहून देण्यात येते. सदरहू कामाची निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर झालेल्या कामाचे देयक पास झाल्याची नोंद यंत्रणेने संगणक प्रणालीमध्ये करावयाची असते.

त्यानंतर शासनाकडून प्रत्येक आठवड्यामध्ये झालेल्या कामांची माहिती पाहण्यात येते व पास झालेल्या देयकाची रक्कम थेट कंत्राटदाराच्या खात्यामध्ये जमा करण्यात येते. त्यामुळे आता जिल्हा परिषदेला निधी पाठविण्याची आवश्यकता नाही आणि योजनांचा निधीही पडून राहणार नाही. पण यामुळे जिल्हा परिषदेला योजनांचा निधी बचत खात्यामध्ये ठेवल्यामुळे मिळणारे व्याज न मिळाल्याने त्यांचे थोडेसे नुकसान होणार आहे.

समितीने, सन २०१४ मध्ये टीएसपी व ओटीएसपी अंतर्गत प्राप्त झालेला निधी वेळेवर खर्च का करण्यात आलेला नव्हता, यासाठी कोण जबाबदार आहे व त्यांच्यावर कोणती कारवाई करण्यात आली आहे ? उक्त प्रकरणी समितीला कळविण्यात येणार होते परंतु अद्यापपर्यंत माहिती सादर करण्यात आली नाही, याबाबत विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, सन २०१४ मध्ये कृषि विभागांतर्गत रक्कम खर्चित नव्हती. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचा १ कोटी ७० लाख रुपये निधी खर्चित राहिला होता. नळ पाणीपुरवठा योजनांची कामे स्थानिक कारणांमुळे पूर्ण होऊ न शकल्यामुळे व काम अपूर्ण असल्याने उक्त कामांची देयके अप्राप्त असल्याने रक्कम खर्च होऊ शकली नाही. नळ पाणीपुरवठा योजनेची वेगवेगळी देयकं सादर न करण्याची वेगवेगळी कारणे आहेत. पाणी व स्वच्छता, बांधकाम विभागाचा निधी अखर्चित राहिला नव्हता. महिला व बाल कल्याण विभागाचा निधी उशिरा प्राप्त झाल्यामुळे पुढील वर्षामध्ये खर्च प्रस्तावित केला होता. आरोग्य विभागाचा १०.७१ कोटी रुपये निधी अखर्चित राहिला होता. उक्त अखर्चित रकमेपैकी ५ कोटी रुपये रक्कम सन २०१२-१३ मधील होती, तर २.८२ कोटी रुपये रक्कम सन २०१३-१४ मधील होती, टीएसपीमधील सन २०१४-१५ मध्ये ७.८४ कोटी रुपये रक्कम अखर्चित होती. सदरहू रक्कम पुढील वर्षामध्ये खर्च करण्यास मान्यता घेण्यात आली होती. आरोग्य विभागाची सर्वात अधिक अखर्चित रक्कम १०.७४ कोटी रुपये होती. तसेच, सन २०१४-१५ मध्ये ७.८४ कोटी रुपये रक्कम अखर्चित होती. समितीची मागणी असेल तर ७.८४ कोटी रुपये रक्कम अखर्चित का राहिला, याची कारणे समजून घेण्यात येतील. सदरहू प्रकरणी कोणी दोषी आढळून आले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. समजा; उक्त निधी अधिक वर्षाच्या दिनांक ३० मार्च रोजी प्राप्त झाला तर तो त्या आर्थिक वर्षामध्ये खर्च होऊ शकत नाही. समितीने आदेश दिले तर सन २०१४-१५ मधील ७.८४ कोटी रुपये अखर्चित निधीच्या संदर्भात चौकशी करण्यात येईल. उक्त निधी केव्हा प्राप्त झाला, तो खर्च का होऊ शकला नाही, याबाबत माहिती घेण्यात येईल. उक्त निधी माहे सप्टेंबर अथवा ऑक्टोबरमध्ये प्राप्त झाला असेल तर तो खर्च व्हावयास पाहिजे होता. उक्त निधी माहे मार्चमध्ये प्राप्त झाला असेल तर त्यामध्ये विभागाची निधी वितरित करण्यामध्ये काही चूक होती का, याबाबी तपासण्यात येतील.

यावर समितीने  जिल्हा परिषदेकडून अनेक कामांच्या रकमा मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येत नाही व पुढील वर्षी खर्च करण्याची परवानगी शासनाकडून मिळविण्यात येते. आरोग्याचा प्रश्न गंभीर व महत्त्वाचा असताना त्या विभागाचा १० कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला नाही. उक्त बाब भूषणावह नाही. सदरहू निधी वेळेत खर्च करणे गरजेचे होते. आयसीडीएसच्या संदर्भातील किंवा एखादी सर्पदंशाची घटना घडली तर आदिवासी विकास विभागास दोष देण्यात येतो. आदिवासी विकास विभागाकडून आदिवासींसाठी दिलेला निधी वेळेत खर्च झाला तर त्याचा सदुपयोग झाल्यासारखे वाटेल.

उक्त निधीतून करावयाच्या कामांसाठी कार्यारंभ आदेश देऊन आदिवासी विकास विभागाने उशिरा निधी वितरित केला असेल तर ती बाब समजू शकतो. परंतु उक्त निधी वितरित करण्यापूर्वी कार्यारंभ आदेश देण्यास मान्यता देण्यात आली असेल तर सदरहू कामे सुरू होणे अपेक्षित आहे. उक्त निधीतून करावयाच्या कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आल्यानंतर कामे सुरू होणे अपेक्षित होते. प्रशासकीय मान्यता व तांत्रिक मान्यता दिल्याशिवाय कामे सुरू करण्यात येत नाहीत. पण कामांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर कामास विलंब झाला असेल व पैसे दिले नसतील ती बाब चुकीची आहे.जोपर्यंत कामांसाठी निधीची मागणी अंतिम होत नाही तोपर्यंत निधी वितरित करण्यात येत नाही. सचिवांनी यावर आरोग्य विभागाच्या अखर्चित ७.८४ कोटी रुपये रकमेच्या संदर्भात चौकशी करण्यात येईल असे सांगितले.

जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची दर ३ महिन्यांनी आरोग्य तपासणी होणे गरजेचे असताना ती होत नसल्याचे समितीला भेटीच्या वेळी आढळून आले. सदर तपासणी होत नसल्याची कारणे विचारली असता मुख्य कार्यकारी अधिका-यांनी आरबीएसकेचा राष्ट्रीय बाल सुरक्षा कार्यक्रम शल्यचिकित्सक यांच्यामार्फत राबविण्यात येतो. यापुढे विद्यार्थ्यांची व्यवस्थित आरोग्य तपासणी होईल याची काळजी घेण्यात येईल. विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी घोडेगाव व जुन्नर येथे २ पथके सुरु करण्यात आली आहेत. त्यांच्या माध्यमातून दर ३ महिन्यांनी एकदा आरोग्य तपासणी करण्यात येते. सदरहू पथकामध्ये वाहनासह एक मेडीकल ऑफिसर, एक फार्मासिस्ट, एक एएनएम, वाहनचालक व शिपाई यांचा समावेश असतो.  समितीने मांडवे ते खेतेवाडी रस्ता दुरुस्ती हे १५ कोटीचे काम असून त्यातील कामे अजून झालेली नाहीत. ते पूर्ण झाल्याचे दाखविले आहे, परंतु अजून काम अपूर्णच आहे. ३०५४ च्या योजनेतून हे काम घेतलेले आहे. फोपसंडी गावातील रस्त्याची वस्तुस्थिती विभागाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे संबंधित अधिका-यांनी प्रत्यक्ष रस्त्याच्या कामावर जाऊन पाहणी करून ते काम पूर्ण का झाले नाही आणि त्याची कारणे काय आहेत इत्यादी बाबतची माहिती समितीला अवगत करावी, अशी सूचना केली.

**अभिप्राय व शिफारशी :**

**बिंदूनामावली :-**

(१) समितीने दिनांक १९ जून, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राथमिक शिक्षक व शिक्षण विभागातील केंद्र प्रमुख व मुख्याध्यापक पदाची बिंदू नामावली सन २०११ पासून सन २०१६ पर्यंत म्हणजेच समितीचा दौरा होईपर्यंत २६ पैकी १२ पदांच्या बिंदू नामावल्या तपासून घेण्यात आल्या नसल्याचे समितीस आढळून आले. बिंदू नामावल्या प्रलंबित राहण्यामागे शासनाकडून प्राप्त झालेले वेगेवेगळे आदेश व परिपत्रके बिंदू नामावल्या तपासून न देणे तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेश इत्यादी कारणे शासनाकडून देण्यात आली. तथापि ही कारणे संयुक्तिक वाटत नाही. कारण न्यायालयाने दिलेले आदेश व शासनाचे निर्णय यासर्व बाबी दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ नंतरचे आहेत. दरम्यान सन २०११ ते २०१७ या काळात बिंदू नामावल्या तपासून अद्ययावत करणे आवश्यक होते. म्हणजेच या काळात बिंदू नामावली न तपासता केलेल्या नियुक्त्या अवैध ठरतात. म्हणून या काळात झालेली भरती व सन २०१६ ते आतापर्यंत म्हणजेच सन २०१८ पर्यंत विभागीय सचिवांच्या साक्षीपर्यंत बिंदू नामावल्या तपासण्यात आल्या नाहीत. **या एकंदरीत कालावधीचा विचार केला तर सन २०११ ते सन २०१८ पर्यंत ७ वर्षांचा विलंब बिंदू नामावल्या तपासण्यासाठी जिल्हा परिषदेकडून झाला आहे. वास्तविक पाहता दर तीन वर्षांनी बिंदू नामावली अद्ययावत करणे बंधनकारक असल्याने जिल्हा परिषदेकडून झालेला हा विलंब अक्षम्य आहे. त्यामुळे बिंदू नामावल्या त्वरित अद्ययावत करून त्याबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी अशी ही समिती शासनास शिफारस करीत आहे.**

**(२) जात पडताळणी प्रमाणपत्र :**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने सन २०१६ मध्ये पुणे जिल्हा परिषदेचा दौरा केला होता. त्यावेळी न्यायालयाच्या आदेशानुसार ८ कर्मचा-यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केली नव्हती. त्यानंतर दौ-यांच्या अनुषंगाने सन २०१८ मध्ये विभागीय सचिवांची साक्ष आयोजित केली होती. या साक्षीच्या वेळीसुद्धा जातवैधता प्रमाणपत्र सादर न केलेल्या त्या ८ कर्मचा-यांवर जिल्हा परिषदेने काही कारवाई केली नसल्याचे समितीस आढळून आले. समितीने याबाबत विचारणा केली असता न्यायालयाच्या आदेशानुसार ते ८ कर्मचारी सेवेत आहेत. समितीच्या असे निदर्शनास आले आहे. की, ही सर्व ८ कर्मचा-यांची प्रकरणे सन २००९ पासून न्यायालयात प्रलंबित आहेत. तेव्हा याचा विहित वेळेत निपटारा करणे गरजेचे होते. दहा-दहा वर्ष अवैध ठरविलेल्या कर्मचा-यांना संरक्षण देऊन ख-या अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नोकरीपासून वंचित ठेवले जाते. हा त्याच्यावर अन्याय आहे. वास्तविक, शासनाने याबाबत विशेष वकिलांची नेमणूक करून पाठपुरावा करावयास पाहिजे होता. परंतु तसे जिल्हा परिषदेकडून व शासनाकडून झालेले नाही. हे शासनाचे मोठे अपयश आहे. शासनाने अनुसूचित जमातींवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी एवढ्या वर्षात कोणतीही उपाययोजना न करणे म्हणजे ख-या अनुसूचित जमातीच्या उमेदवारावर केलेला अन्याय आहे. **शासनाच्या या दुर्लक्षामुळे खरे अनुसूचित जमातीचे उमेदवार त्यांना मिळणा-या नोकरीपासून मुकले**

**आहेत. तेव्हा उक्त ८ कर्मचा-यांच्या बाबतीत जात पडताळणी समितीकडे पाठपुरावा करून अवैध ठरल्यास सेवेतून मुक्त करून त्यांनी जेवढी वर्ष सेवेचा गैरफायदा घेतला तेव्हापासून त्यांच्याकडून आर्थिक लाभाची वसुली करण्यात यावी. तसेच यास जबाबदार असणा-या अधिका-यांची चौकशी करून कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल शासनाने समितीला तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**अखर्चित निधीबाबतः-**

(३) विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी, सन २०१४ पासून अदिवासी उपयोजना व बाह्यक्षेत्राअंतर्गत प्राप्त झालेला निधी जिल्हा परिषदेच्या अनेक विभागांनी वेळेवर खर्च न करणे, निधी अखर्चित ठेवणे, विशेषतः आरोग्यासारख्या महत्त्वाच्या विभागाने निधी खर्च न करण्याची बाब समितीच्या निदर्शनास आली. आरोग्य विभागाचा १०.७१ कोटी रुपये निधी अखर्चित राहिला होता. त्यामध्ये २.८२ कोटी रुपये रक्कम सन २०१३-१४ मधील होती. आदिवासी उपयोजनेमधील सन २०१४-१५ मध्ये ७.८४ कोटी रुपये रक्कम अखर्चित होती.

जिल्हा परिषदेकडून अनेक कामांच्या रकमा मोठ्या प्रमाणात अखर्चित राहतात. त्यासाठी पुढील वर्षी खर्च करण्याची परवानगी शासनाकडून मिळविण्यात येते आरोग्याचा प्रश्न गंभीर व महत्त्वाचा असताना त्या विभागाचा १० कोटी रुपये निधी खर्च करण्यात आला नाही. सदर बाब भूषणावह नाही. सदरहू निधी वेळेत खर्च करणे गरजेचे होते. आदिवासी विकास विभागाकडून आदिवासींसाठी दिलेला निधी वेळेत खर्च झाला तर त्याचा सदुपयोग झाल्यासारखे वाटेल. **सबब, आरोग्य विभागाच्या अखर्चित ७.८४ कोटी रुपये रकमेच्या संदर्भात संपूर्ण चौकशी करून निधी अखर्चित राहण्याची कारणे व त्यास जबाबदार असणा-यांवर शासनाकडून केलेल्या कारवाईची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, जि. पुणे**

**जात प्रमाणपत्र पडताळणी :**

अनुसूचित जमाती कल्याण समितीने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयास दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी समितीने अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, या कार्यालयांतर्गत येणा-या घोडेगाव, जि. पुणे येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचा-यांची माहिती घेत असताना वर्ग-४ मधील ३ कर्मचा-यांची प्रकरणे जात पडताळणी समितीकडे केव्हापासून प्रलंबित आहेत व या कर्मचा-यांची सेवेत केव्हा नियुक्ती झाली आहे अशी विचारणा केली असता प्रकल्प अधिका-यांनी विदित केले की, श्रीमती जी. डी. कानडे यांची नियुक्ती १९८४ मध्ये झाली आहे. श्री. गवारी जी. के. कामाठी यांची नियुक्ती दिनांक १३ फेब्रुवारी, १९८५ रोजी झालेली आहे त्यापैकी श्री. एस. एन. हिले हे सन २००७ पासून शाळेत गैरहजर आहेत, त्यांची विभागीय चौकशी सुरू आहे. श्री. हिले यांना फरार होण्यास सात वर्षांचा कालावधी झाल्यानंतर त्यांच्या विरूद्ध बडतर्फीची कार्यवाही सुरू करण्यात येईल.

**आश्रमशाळा व नामांकित शाळांवर करावयाच्या खर्चाबाबत :-**

समितीने सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या वर्षात प्रकल्प कार्यालयास प्राप्त झालेल्या निधीतून आदिवासी आश्रमशाळा/वसतिगृहांना व नामांकित आश्रमशाळांना कोणकोणत्या सोयी-सुविधा पुरविण्यात आल्या आहेत तसेच प्रकल्प कार्यालयांतर्गत राबविण्यात आलेल्या योजनांवर किती रक्कम खर्च करण्यात आली आहे, याबाबत विचारणा केली असता अपर आयुक्तांनी खालीलप्रमाणे खुलासा केला :

सन २०१२-१३ मध्ये प्राप्त निधी २२१७.१६ लक्ष रुपये होता. हा संपूर्ण निधी खर्च करण्यात आलेला आहे. सन २०१३-१४ मध्ये प्राप्त निधी २१६६.१४ लक्ष रुपये होता. हा संपूर्ण निधी खर्च करण्यात आला आहे. सन २०१४-१५ मध्ये प्राप्त निधी २३७९.६२ लक्ष रुपये होता. हा संपूर्ण निधी खर्च करण्यात आलेला आहे. या रकमेतून अनुसूचित जमातीच्या आश्रमशाळातील विद्यार्थ्यांना अनुदान देण्यात आले आहे. डोंगराळ व दुर्गम भागात राहणा-या आदिवासी लोकांना या निधीचा फायदा झालेला आहे. अनुदानित आश्रमशाळा ८ आहेत व शासकीय आश्रमशाळा १९ आहेत, शासकीय आश्रमशाळेमध्ये कनिष्ठ महाविद्यालय आहे, त्या आश्रमशाळांना सन २०१२-१३ मध्ये ११.९६ लक्ष रुपये, सन २०१३-१४ मध्ये २१.३३ लक्ष रुपये व सन २०१४-१५ मध्ये २८.१० लक्ष रुपये निधी देण्यात आलेला होता. हा संपूर्ण निधी खर्च करण्यात आलेला आहे.शैक्षणिक अनुदान देण्यासाठी उत्पन्न मर्यादा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक अनुदान देण्यात आलेले आहे. निवासी आश्रमशाळांसाठी सन २०१२-१३ मध्ये १२५ लक्ष रुपये, सन २०१३-१४ मध्ये १९४ लक्ष रुपये व सन २०१४-१५ मध्ये १५४ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला होता हा संपूर्ण निधी अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी आश्रमशाळांमध्ये प्रवेश देण्यासाठी खर्च करण्यात आलेला आहे.

घोडेगाव प्रकल्प कार्यालयांतर्गत महाबळेश्वर येथील पाचगणी, पुणे येथील आळंदी व जुन्नर तालुक्यातील लांडेवाडी येथे नामांकित आश्रमशाळा आहेत. नामांकित शाळांमधील एका विद्यार्थ्यासाठी प्रत्येक वर्षाला ४० हजार रुपये अनुदान देण्यात येते. आता ही रक्कम ५० हजार रुपये करण्यात आलेली आहे. लांडेवाडी, शिवनेरी येथील आश्रमशाळेला ४० हजार रुपये अनुदान देण्यात आले आहे. तालुकास्तर, जिल्हास्तर व विभागस्तर असे तीन स्तर आहेत, शासन निर्णयानुसार या वर्षासाठी नामांकित शाळांना प्रतिवर्षी प्रती विद्यार्थी ५० हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. शाळा व्यवस्थापकांनी ५० हजार रुपयांची मागणी केलेली आहे. २५ हजार रुपयांचे दोन हप्ते देण्यात आले आहेत, आपल्या समोर जी माहिती सादर करण्यात आलेली आहे, ती तीन वर्षांची आहे. ४०-४५ व ५० हजार रुपये देण्याचा शासन निर्णय या वर्षात काढण्यात आलेला आहे. तालुकास्तरावर ४० हजार रुपये जिल्हास्तरावर ४५ हजार रुपये व विभागीयस्तरावर ५० हजार रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी राबवावयाच्या योजना :—**

समितीने, सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत प्रकल्प कार्यालयाकडून केंद्रवर्ती अर्थसंकल्प योजनांतर्गत प्राप्त झालेल्या निधीतून योजनानिहाय कोणकोणती कामे घेण्यात आली व त्यावर किती खर्च करण्यात आला याबाबत माहिती देण्यास सांगितले असता प्रकल्प अधिका-यांकडून समितीस खालील माहिती मिळाली.–

सन २०१२-१३ मध्ये वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी १ कोटी ५७ लाख रुपये निधी प्राप्त झाला होता आणि ७,२३६ चा लक्षांक होता. हा लक्षांक साध्य झालेला आहे. अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांसाठी ८५ टक्के अनुदानावर स्वयंपाकासाठी भांडी देणे ही योजना राबविण्यात आलेली आहे. यातील सर्व लाभार्थी सोलापूर जिल्ह्यातील होते. त्यासाठी ३,८२,५०० रुपये एवढा निधी सोलापूर मंडळाकडे वर्ग केलेला आहे. इयत्ता १२ वी मधील विद्यार्थ्यांना एमएससीआयटीचे प्रशिक्षण देणे, अनुसूचित जमातीच्या विद्यार्थीनींना ब्युटी हर्बलचे प्रशिक्षण देण्यासाठी १ लाख ३५ हजार रुपये निधी प्राप्त झाला होता. विद्यार्थ्यांना डिप्लोमा सॉफ्टवेअर व हार्डवेअरचे प्रशिक्षण देणे , त्याचप्रमाणे कौशल्य विकास कार्यक्रमासाठी सन २०१२-१३ मध्ये ७५ लाख रुपये प्राप्त झाले होते आणि ३२४ चा लक्षांक होता. हा लक्षांक साध्य झालेला आहे. सन २०१३-१४ मध्ये १ कोटी १० लाख रुपये प्राप्त झाले होते आणि ६०० चा लक्षांक होता. हा लक्षांक साध्य झालेला आहे. सन २०१४-१५ मध्ये ७८ लाख रुपये प्राप्त झाले होते आणि ५४९ चा लक्षांक होता. हा लक्षांक साध्य झालेला आहे. सन २०१२-१३ व २०१४-१५ मध्ये लाभार्थ्यांना गारमेंट टेक्स्टाईल मॅन्युफॅक्चरींग ॲन्ड फॅशन डिझाईन प्रशिक्षण तसेच, बेकरी पदार्थ बनविणे, इलेक्ट्रीक वायरमन तसेच सुरक्षकांचे प्रशिक्षण दिलेले आहे. सध्या ते लाभार्थी चाकण येथे सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत आहेत. यासाठी संस्थांना अगोदर ५० टक्के रक्कम दिली जाते.

समितीने, वीजपंप व तेलपंप वाटपासाठी लाभार्थ्यांची निवड कशी केलेली आहे असा प्रश्न केला असता प्रादेशिक व्यवस्थापकांनी स्पष्ट केले की, जे अर्ज प्राप्त होतात त्यांची छाननी करून वरिष्ठ अधिका-यांची मान्यता घेऊन ते अर्ज जिल्हाधिका-यांकडे पाठविले जातात. जेवढे अर्ज मंजूर होतात त्यानुसार रक्कम मंजूर करून ती आदिवासी विकास महामंडळाकडे पाठविली जाते. सन १९८० पासून सन २००२ पर्यंत लाभार्थ्यांना वीजपंपाचे वाटप केलेले आहे. सन २००२-०३ पासून वीजपंप पुरवठा करणे बंद झाले आहे. सन २०१२-१३ मध्ये ७९ तेलपंप प्राप्त झाले होते. त्यांचे वाटप केलेले आहे. सन २०१३-१४ मध्ये ७७ वीजपंप प्राप्त झाले होते. हा लक्षांक साध्य झालेला आहे. सन २०१४-१५ मध्ये वाटप करावयाच्या तेलपंपासाठी निधी प्राप्त झाला आहे मात्र अद्याप खरेदी झालेली नाही.

यावर समितीने, शेतक-यांना आर्थिकदृष्ट्या तेलपंपाचा वापर करणे परवडते काय, ही शेतक-यांना कर्जात टाकणारी योजना आहे. आपण वीजपंपाचा पुरवठा करणे बंद केलेले आहे. या ठिकाणी वीज पोहोचलेली नाही अशा ठिकाणी डिझेल पंप देता येतील. तेलपंप द्यायचे की विद्युत पंप द्यायचे याचा निर्णय वीज उपलब्धता पाहून घेतला पाहिजे असे स्पष्ट केले.

समितीने, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात कोणकोणती कामे घेण्यात आली, या योजनेंतर्गत किती निधी प्राप्त झाला व त्यापैकी खर्च करण्यात आलेल्या निधीबाबत विचारणा केली असता अपर आयुक्तांनी विदित केलेले की, २०१२-१३ मध्ये प्राप्त निधी रु. २३.९० इतकी आहे. ती पूर्ण रक्कम खर्च झाली. जिल्हाधिका-यांनी प्रशासकीय मंजुरी दिली आहे. यावर्षी नंदूरबार, पालघर व ठाणे जिल्हाधिका-यांनी सचिवांना डीओ लेटर लिहून वेगळी मागणी केली आहे. तो प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. ठक्कर बाप्पा वस्तीसुधार योजना यापुढे एटीसी कडून जाण्याची शक्यता आहे. तसेच न्यूक्लिअस बजेटची योजनासुद्धा ३१ मार्च नंतर एटीसीकडून शासन जिल्हाधिका-यांकडे वळविणार आहे. सार्वजनिक बांधकामाच्या विषयाबाबत कार्यकारी अभियंत्यांचे एक नवीन युनिट एटीसी स्तरावर सुरू होणार आहे. प्रकल्प अधिकारीस्तरावर उप अभियंता आणि विभागस्तरावर मुख्य अभियंता असणार आहेत. आश्रमशाळा बांधण्याची जागा निश्चित करणे हे नवीन काम सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी आदिवासी विभागाच्या अंतर्गत राहील. शासनाच्या आम्ही ही बाब निदर्शनास आणली. दोन महिन्यापासून मंत्री महोदय सुद्धा मुख्य अभियंत्यांबरोबर बैठक घेत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ५२ कामे विभागाने स्वतःकडे घेतली आहेत. त्यापैकी ३८ कामे अडली होती, त्याचा आढावा घेऊन तेवढा निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामे काढून घेऊन स्पेशल प्रकल्प मॅनेजमेंट सल्लागार नेमण्याबाबत अधिकार द्यावा हा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने मान्य केला नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाचा नकार मुख्यमंत्र्यांनी मान्य केला आणिविभागाला वेगळा प्रस्ताव पाठवावयास सांगितले. आता सार्वजनिक बांधकाम विभागाचे वेगळे युनिट तयार होणार आहे. शबरी घरकुल योजनेसह सर्व विभागाच्या ग्रामीण घरकूल योजना एकत्र करून राबविण्यात येणार आहेत.

यावर एटीसीकडून योजना काढून त्या इतर यंत्रणांना देण्याच्या प्रस्तावांना या समितीचा विरोध राहील अंतिम मंजुरीचा निर्णय एटीसीकडेच असावा असे समितीचे स्पष्ट अभिप्राय आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव जि. पुणे यांच्या संदर्भातील दिनांक २५ एप्रिल, २०१८ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी माहिती घेत असताना समितीने पुणे जिल्ह्यातील माळीण गावाची डोंगर कोसळून जी दुर्घटना झाली होती त्यासंबंधी माळीण गावची शाळा आणि अंगणवाड्यांच्या बाबतीत सद्यःस्थितीची माहिती देण्यास सांगितले असता जिल्हाधिका-यांनी खालीलप्रमाणे माहिती दिली.

माळीण गावाचे संपूर्ण पुनर्वसन झाले आहे. सर्व बांधकामे तयार आहेत. सर्व पदांवर संबंधित नियुक्त्या झालेल्या आहेत आणि मदत व पुनवर्सन विभागामार्फत तसेच घोडेगाव प्रकल्प कार्यालयामार्फत सर्व संबंधितांना नुकसान भरपाईचे संपूर्ण वाटप झालेले आहे. नवीन गावाचे उद्घाटन सुद्धा झाले आहे, दरम्यानच्या काळात एक रस्ता खचला होता त्या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आली आहे. पहिल्या वर्षीच्या

पावसाळी काळात असे घडले होते. कारण हा भाग जास्त पावसाचा असल्यामुळे पहिल्या पावसाळ्यात हा भाग खचला होता त्यामुळे पुणे जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नॉर्थ शाखेने ते काम केल्यामुळे दुरुस्तीचे संपूर्ण काम झाले आहे. या ठिकाणी वनीकरणाचे आणि इतर सर्व काम झाले असल्यामुळे आता कोणतीही अडचण राहिलेली नाही. तसेच माळीण ग्रामपंचायतीमधील ६५ तरुणांपैकी २८ तरुणांना विविध खासगी संस्थांमध्ये रोजगार उपलब्ध करून दिलेला आहे. काही तरुण शेती व्यवसाय करीत आहेत. कारण त्यांची वडिलोपार्जित शेती आहे. काही तरुणांना पशुपालन व्यवसायाबाबत शासनातर्फे अर्थसहाय्य करण्यात आले आहे. माळीण गावाचे पुनर्वसन झाले होते ते डोंगराच्या दुस-या बाजूला झाले होते आणि त्या ठिकाणी या ८ एकर जागेची खरेदी करण्यात आली होती. पुनर्वसित जागेवर संपूर्ण नागरी सुविधांचे बांधकाम करण्यात आले आहे. लोकांचे तेथे पुनर्वसन सुद्धा झालेले आहे.

**सबळीकरण व स्वाभिमान योजना :—**

समितीने, सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत लाभार्थ्यांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली आहे. विचारणा केली असता अपर आयुक्तांनी विदित केले की, या योजनेंतर्गत सन २००५-०६ मध्ये ३ लाभार्थी आणि सन २००८-०९ मध्ये ४ लाभार्थी अशा एकूण ७ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ प्रकल्प कार्यालयाकडून देण्यात आला आहे. स्वाभिमान सबलीकरण योजनेंतर्गत आदिवासी शेतक-यांना शासनातर्फे जमिनी देण्यात येतात. त्यामध्ये शासनाचे ५० टक्के अनुदान आणि कर्जाची रक्कम ५० टक्के असे आहे. या योजनेमध्ये शासन ज्यांच्याकडून जमिनी खरेदी करते त्या जमिनी शासनाच्या प्रचलित शिघ्रसिद्धगणकाचे दर व त्यापेक्षा २० टक्के अधिक दर देऊन खरेदी केल्या जातात परंतु प्रत्यक्षात बाजारभावापेक्षा शासनाच्या प्रचलित शिघ्रसिद्धगणकाचे दर बरेच कमी असतात. त्यामुळे रेडी रेकनरचे दर किंवा त्यावरील वाढीव २० टक्के दराची रक्कम देऊन सुद्धा अशा जमिनी देण्यास कोणी तयार होत नाही. त्यामुळे दरामध्ये अशा जमिनी मिळत नाहीत. संपूर्ण राज्यामध्ये हा प्रश्न आहे.

त्यावर समितीने रेडीरेकनर दर आणि वाढीव २० टक्के दर यासंबंधी आता धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आपण आजचे मुल्यांकन दर जरी घेत असलो तरी गावपातळीवर जमिनींचे व्यवहार होत असताना बाजारभावाचे दर लावले जातात परंतु प्रत्यक्ष व्यवहारामध्ये मुद्रांक शुल्क कमी लागावे या दृष्टीने त्या जमिनीचे दर कमी दाखविले जातात. त्यामध्ये प्रत्यक्ष व्यवहाराची रक्कम करारनाम्यात दाखविण्यात येण्यासाठी या नियमात बदल झाला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली असता प्रधान सचिवांनी याबाबतीत खुलासा केला की, हे प्रकरण मुख्य सचिवांसमोर सादर केले होते. त्यामध्ये दोन भाग आहेत. एक म्हणजे हे निकष बदलण्याची गरज आहे. दुसरे असे की अशाच प्रकारच्या योजना सामाजिक न्याय विभागामध्ये राबविण्यात येतात त्यामध्ये वेगळे निकष आहेत. त्यामुळे यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने

संपूर्ण राज्यासाठी एकसारखे निकष असावेत याकरिता महसूल विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. कारण जमिनीचे मुल्यांकन दर ठरविण्याचे काम महसूल विभागामार्फत करण्यात येते आणि जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी या योजनेचे अध्यक्ष आहेत. त्यामुळे मी मुख्य सचिवांना यासंबंधी विनंती केली होती की, सर्व विभागांमधील अशा प्रकारच्या मुल्यांकनाच्या प्रकरणांमध्ये एकरुपता आणण्यासाठी शासनाने धोरण निश्चित करावे. भूसंपादन कायद्यानुसार आपण ज्यावेळी सार्वजनिक प्रयोजनासाठी जमीन अधिग्रहण करतो त्यासाठी तो लागू आहे आणि त्यामध्ये मुल्यांकनाची काही पद्धत दिलेली आहे. मात्र ही योजना वैयक्तिक स्वरुपाची आहे. त्यामध्ये भूसंपादन असो किंवा नसो, जर कोणी भूमिहीन असेल तर त्यांना शासनाकडून जमिनी विकत घेऊन त्या भूमिहीनांना देण्याची योजना आहे समितीची सूचना आहे की भूसंपादन कायद्याच्या अधिग्रहणाची जी प्रक्रिया आहे त्याच धर्तीवर या योजनेची पुनर्रचना करण्यासाठी आपल्याला विचार करता येईल. मात्र हे करताना सुद्धा आपली समिती शिफारस करू शकते की सामाजिक न्याय विभाग अनुसूचित जाती आणि जमातींसाठी जमीन खरेदी करणार आहे आणि आदिवासींसाठी आदिवासी विकास विभाग अशा जमिनी खरेदी करणार आहे. त्यामुळे यामध्ये सुसूत्रता आली पाहिजे. नाही तर एकाच जिल्ह्यामध्ये दोन वेगवेगळे निकष असतील तर त्यामध्ये अडचण निर्माण होईल.

**अनुसूचित जमातींच्या घरकुल योजना :-**

समितीने, शबरी घरकूल योजनेंतर्गत २० वर्षांपूर्वी ज्यांना घरकूल वाटप करण्यात आले होते ते आता मोडकळीस आले असून ते राहण्यास योग्य नसल्यामुळे अशा लाभार्थ्यांना आपण पुन्हा खास बाब म्हणून शबरी घरकुल योजनेत त्या रहिवाशांना लाभ देणार आहात काय? अशी विचारणा केली असता प्रधान सचिवांनी स्पष्ट केले की, सध्या घरकुलांच्या बाबतीत जे धोरण आहे त्यामध्ये ग्रामविकास विभागाने एक राज्य व्यवस्थापन कक्ष स्थापन केला आहे. त्यामुळे सर्व प्रकारच्या घरकूल योजना त्यांच्यामार्फत राबविण्यात येतात. पूर्वी ज्यांना घरकुले या योजनेतून मंजूर झाली आहेत ती मोडकळीस आली असून त्यांना पुन्हा नव्याने या योजनेतून घरकुले सध्या तरी शक्य नाही. कारण यामध्ये आपण जो प्राधान्य क्रम ठरविला आहे त्यात पहिली पंतप्रधान आवास योजना आहे. त्या पीएमवाय योजनेचे निकष केंद्र शासनाने ठरवून दिले आहेत. त्यामध्ये अनुसूचित जमातीच्या लोकांना लाभ मिळतात. पण त्यांच्या निकषानुसार त्यांची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने होते आणि त्यांची अंमलबजावणी होते. त्याशिवाय आदिवासी विकास विभागाच्या तीन घरकुलाच्या योजना आहेत. एक म्हणजे शबरी घरकूल योजना, दुसरी आदिम जमाती घरकूल योजना आणि तिसरी पारधी घरकूल योजना आहे.

शबरी घरकूल योजनेचा मुख्यमंत्री महोदय आढावा घेत असतात. पी.एम.वाय. योजनेमध्ये आर्थिक उत्पन्नाची अट असून मासिक १० हजार रुपयांपर्यंत उत्पन्न असलेल्यांनाच लाभ देण्यात येतो. घरी रेफ्रीजरेटर, टी.व्ही. किंवा वाहने असतील तर ते देखील अपात्र होतात. मासिक उत्पन्न १० हजार रुपये एवढे निश्चित करून सन २०११ च्या जनगणनेनुसार जे लोक शिल्लक राहतात ज्यांना आपण पी.एम.वाय.

योजनेंतर्गत कव्हर करू शकत नाही त्यांना सर्वेक्षणानुसार जिल्हानिहाय तीन वर्षांचा लाक्षांक दिला आहे. अगोदर या सर्व लोकांना घेतल्यानंतरच दुबार लाभार्थी किंवा घरे मोडलेल्या लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देता येईल. कारण ज्यांना अद्यापपर्यंत योजनेचा लाभच मिळालेला नाही त्यांना अगोदर लाभ दिला पाहिजे.

यावर समितीने सन २००२-०३ साली घरकुले बांधण्यासाठी २८ हजार ५०० रुपये एवढा निधी दिला जात होता. आता शबरी योजनेंतर्गत व इतर घरकुलांसाठी १ लाख २० हजार रुपयांपेक्षा जास्त निधी मिळतो. सन २००२-०३ पासून आतापर्यंत १५ वर्षांपेक्षा जास्त कालावधी निघून गेला आहे. २८ हजार ५०० रुपये निधी घेऊन बांधलेली घरकुले मातीकामामध्ये कच्च्या स्वरुपाची बांधलेली आहेत. कारण तेवढ्या पैशांमध्ये पक्के घर बांधणे शक्य नव्हते. २८ हजार ५०० रुपये व आणखी दीड हजार रुपये असे मिळून एकूण ३० हजार रुपयांचा निधी त्यावेळी मिळत असे. १५ वर्षांच्या कालावधीतील शाळा किंवा राज्य शासनाच्या अखत्यारीतील इतर सरकारी इमारतींचा विचार केला तर शासनाने वेळोवेळी त्यांच्यावर भरपूर खर्च केला आहे. कदाचित त्यावेळच्या मुल्यांकनाएवढी खर्चाची रक्कम दुरुस्तीसाठी दिली गेली असेल. अशा वेळी १५ वर्षांपेक्षा जास्त जुन्या झालेल्या, मोडकळीस आलेल्या घरकुलांसंदर्भात लाभार्थ्यांना दुबार लाभ देण्याबाबत आदिवासी विकास विभाग विशेष प्रयत्न करणार आहे का ? अशी विचारणा केली असता विभागातर्फे असे स्पष्टीकरण देण्यात आले की, सन २०१६-१७ पासून शबरी योजना सुरू झाली. सन २०१६-१७ च्या यादीमध्ये हे निकष नव्हते. सन २०१७-१८ पासून तो लागू झाला. यामध्ये एक्सक्लुझन लिस्टमधील लाभार्थ्यांना अगोदर घेण्याची शासनाची किंवा विभागाची भूमिका योग्य आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, आम्हाला ८०७ लाभार्थ्यांची एक्सक्लुझ लिस्ट पाठविली. आम्हाला २५९ चे उद्दिष्ट आहे. परंतु प्रत्यक्षात केवळ १२२ पात्र लाभार्थी मिळाले. बाकी लाभार्थी अपात्र होण्याची अनेक कारणे आहेत. माझे या निमित्ताने म्हणणे आहे की, सदर पात्र लाभार्थ्यांना प्राधान्य तर द्यावेच परंतु त्याचबरोबर उर्वरित लाभार्थी म्हणून ज्यांची घरे कच्ची आहेत किंवा ज्यांना घरेच नाहीत त्यांचा देखील विचार करावा. तसा प्रस्ताव शासनाकडे सादर केलेला आहे.

आदिवासी विकास विभागाच्या प्रधान सचिवांनी पुढे असेही स्पष्ट केले की, राज्य व्यवस्थापन समिती योग्य निर्णय घेईल. यामध्ये दोन विषय आहेत. एखाद्या विशिष्ट जिल्ह्यांमध्ये काही अडचण असेल तर शासनाने त्याचा विशेष बाब म्हणूनच विचार केला पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे घरकुलांबाबतचे धोरण राज्यस्तरीय आहे. ब-याच वेळी स्थानिक स्तरावरील प्रश्नांचा विशेष बाब म्हणून वेगळा विचार केला जातो. यासाठी राज्यस्तरीय धोरणामध्ये बदल करण्याची वेळ आली आहे असे वाटत नाही. लाभार्थी

मिळत नाहीत, असा प्रत्येक जिल्हयामधून फिडबॅक आला तर त्यावेळी असा वेगळ्या प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेता येईल. सध्या पंतप्रधान योजनेचे, एस.सी.सी.चे जे निकष आहेत, त्याशिवाय सर्व जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाला योग्य त्या सूचना दिल्या आहेत. पारधी समाज व आदिम जमातींसाठी कुठलेच निकष लावलेले नाहीत. त्यांना जेथे राहायचे असेल व जेवढा निधी पाहिजे असेल, त्यासाठी त्यांना कोणत्याही चाकोरीमध्ये बांधून ठेवलेले नाही. विशेष बाब म्हणून तसा प्रस्ताव आमच्याकडे पाठवू शकतात. याव्यतिरिक्त देखील रिसोर्सेस उपलब्ध करण्यासाठी आपण टारगेट दिले आहेत. मात्र दुरुस्तीसाठी सध्या ही बाब नाही. पुणे जिल्ह्यामध्ये लक्षांकाबाबत काही विशेष बाब असेल तर तसा प्रस्ताव अद्याप माझ्यासमोर आलेला नाही. डी.आर.डी.ए. ने असा प्रस्ताव पाठविला असेल तर आपण त्याबाबत योग्य विचार करू.

समितीने शबरी घरकुले तसेच आदिम जातीच्या घरकुलांसाठी दिलेला निधी किती, खर्च झालेला निधी किती, अखर्चित राहिलेला निधी किती व अखर्चित राहिलेल्या निधीची कारणे काय आहेत, पूर्ण झालेला अपूर्ण राहिलेली घरकुले याबाबत समितीला माहिती देण्यास सांगितले असता शबरी घरकूल योजनेसाठी राज्य व्यवस्थापन कक्षाला पैसे देण्यात येतात. सन २०१५-१६ साठी ७० कोटी रुपये, सन २०१६-१७ मध्ये १७२ कोटी ३४ लाख रुपये, सन २०१७-१८ मध्ये १३२ कोटी व सन २०१८-१९ साठी १५० कोटी रुपये डिसबर्स केले आहेत. यामधून किती लाभार्थ्यांना पहिला, दुसरा, तिसरा हप्ता दिला याबाबत आढावा घेत असतो व त्याची आकडेवारी आमच्याकडे असते. या योजनेवर झालेल्या खर्चाचा हिशेब राज्य व्यवस्थापन समितीकडे असतो असे प्रधान सचिवांकडून नमूद करण्यात आले.

**बिंदू नामावली :—**

समितीने, शाळा परिचर ३, कामाठी-७, स्वयंपाकी -१३ यांचा अनुशेष राहण्याची कारणे काय आहेत ? असा प्रश्न केला असता सहायक आयुक्त, मागासवर्ग कक्ष यांच्याकडून बिंदू नामावली दिनांक ३ मार्च,२००८ रोजी तपासण्यात आली. शेवटची भरती सन २००९ मध्ये करण्यात आली होती. वर्ग-४ या पदाची भरती २००९ नंतर करण्यात आलेली नाही. भरतीसाठी शिल्लक पदे प्रयोगशाळा परिचर-३, कामाठी-७, स्वयंपाकी-१३ अशी एकूण वर्ग-४ ची २३ पदे रिक्त आहेत. सन २००८ नंतर बिंदू नामावलीची तपासणीबाबत सविस्तर माहिती घेऊन यास कोण जबाबदार आहे, याचीही माहिती घेऊन योग्य ती कारवाई करण्यात येईल.

सन २००८ पासून रोस्टरची तपासणी केलेली नाही. सन २०१६ मध्ये समितीने दौ-याच्या वेळी या संदर्भात सूचना दिल्या होत्या. त्यानंतरही सन २०१८ पर्यंत बिंदू नामावली तपासण्यात आली नाही. बिंदू नामावली ही त्या कार्यालयाचा आरसा असतो. बिंदू नामावली प्रमाणित असणे म्हणजे कार्यालय अद्ययावत आहे, असे समजले जाते. बिंदू नामावली प्रमाणे आपल्या कार्यालयातील किती जागा रिक्त आहेत, किती पदोन्नतीस पात्र आहेत, हे कसे कळेल ? समितीच्या दौ-याच्या वेळी व दिनांक २२ नोव्हेंबर, २०१७

रोजीची साक्षही कार्यवाहीअभावी पुढे ढकलली. तरीही आपण जर त्याच चूका पुन्हा करीत असाल तर ते योग्य नाही, असे मत मांडले असता अपर आयुक्तांनी विदित केले की, या विषयासंदर्भात मी एक महिन्यात वरिष्ठांना विनंती करून यासंदर्भात ज्यांची चूक झाली, त्यांची चौकशी करून बिंदू नामावली अद्ययावत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तत्कालीन अधिकारी-कर्मचा-यांवर महिन्याभरात कारवाई सुरू करण्यात येईल.

**ठक्कर बाप्पायोजनेसाठी वापरावयाचा निधी :—**

समितीने ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत मागील तीन वर्षात किती निधी प्राप्त झाला, किती निधी अखर्चित आहे अशी विचारणा केली असता अपर आयुक्तांनी खालील माहिती दिली. सन २०१४-२०१५ मध्ये प्राप्त तरतूद ही ३१०.८४ लक्ष आहे. त्यापैकी २.२५ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. सन २०१५-२०१६ मध्ये ४.५० लक्ष रुपये प्राप्त झाले होते. त्यापैकी २.४२ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. सन २०१६-२०१७ मध्ये २.४९ लक्ष तरतूद होती त्यापैकी १.२४ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. असे एकूण तीन वर्षांमध्ये १०.११ कोटी रुपयांच्या तरतुदी पैकी ५.९३ लक्ष म्हणजे जवळपास ६ कोटी रुपये खर्च झालेले आहेत. ठक्कर बापा योजनेचे प्रशासकीय मंजुरी देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी कार्यालयास गेलेले आहेत. सदरची योजना डीपीसीमध्ये घेतली गेली. ५० टक्के काम पूर्ण झाल्यानंतर एक किंवा दोन वर्षात त्यांना आपण पेमेंट करतो.

यावर आर्थिक बाबींच्या बाबतीत जिल्हा परिषदेकडे दोन वर्षे पैसे ठेवण्याचे अधिकार आहेत. प्रस्तावित कामाचा खर्च करता यावा आणि ते पैसे संपवावे म्हणून राज्य शासनाने त्यांना विशेष अधिकार दिले आहेत, ते पैसे खर्च झाले पाहिजेत. या नियमाच्या पलिकडे जाऊन आपण आपल्या स्तरावर निर्णय घेत आहात असे समितीने मत मांडले.

**नामांकित आश्रम शाळा :—**

समितीने, पाचगणीला एक नामांकित शाळा आहे. तेथे एका आदिवासी मुलाचा मृत्यू झाला अशी तक्रार असल्याचे निदर्शनास आणून दिले असता या मुलाच्या मृत्यु प्रकरणी तपासणी केली आहे. हा मुलगा डहाणू प्रकल्पाशी संबंधित होता. त्यामध्ये एटीसी यांनी एक समिती स्थापन केली होती आणि त्या समितीमध्ये त्या मुलाचे वडील सुद्धा सहभागी होते. मुलाच्या मृत्यू प्रकरणी चौकशी करुन पोस्टमार्टमही केले होते. या प्रकरणी कोणतेही कट कारस्थान असल्याचे दिसत नाही असा खुलासा केला.

यावर, समितीने एटीसी म्हणून जरी तुम्ही तेथे गेले होते तरी आदिवासी आयुक्तांनी त्या ठिकाणी जाणे अपेक्षित नाही काय. कारण एक आदिवासी विद्यार्थी त्या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी गेला होता

आणि तो तेथे मृत पावला. यामध्ये थातूरमातूर चौकशी करुन त्या संस्थेच्या अध्यक्षांना आणि नामांकित शाळेला वाचविण्याचे पूर्णपणे प्रयत्न केले आहेत.

पुणे जिल्ह्यातील घोडेगांवला आदिवासी आश्रमशाळा आहे. शिवनेरी येथील विद्यार्थ्यांना या आश्रमशाळेमध्ये येताना प्रचंड त्रास होत आहे. त्या दृष्टीने काही कार्यवाही करण्यात आली आहे काय असा प्रश्न केला असता अपर आयुक्तांनी, याशिवनेरी शाळेची मान्यता रद्द केली असून त्या शाळेमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना शहापूर तालुक्यातील आट्टामली गावामध्ये असलेल्या शाळेमध्ये स्थलांतरीत करण्यात आले आहे असा खुलासा केला.

यावर समितीने विभागाच्या असे लक्षात आणून दिले की, नामांकित शाळा सुरू करण्याचा राज्य शासनाचा अतिशय चांगला व सकारात्मक उपक्रम आहे. पण तरी सुद्धा या शाळांच्या गुणांकनाच्या बाबतीत एटीसीच्या माध्यमातून चुकीची प्रक्रिया राबविली जात आहे. त्यामुळे त्यावर आपण आयुक्त म्हणून लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. कारण ज्या शाळा पात्र नाहीत त्यांना सुद्धा नामांकित समजून विद्यार्थी देण्याचा प्रयत्न होत आहे. यामधून उदाहरण द्यायचे झाले तर संस्थानिकांच्या आश्रमशाळा सुरू ठेवण्याची एकप्रकारे सोय केल्याचा प्रयत्न होत आहे. भविष्यात असे होऊ नये यासाठी आयुक्तांनी दक्षता घ्यावी अशा समितीच्या सूचना आहेत. स्थानिक ठिकाणी काम करणारे आम्ही लोकप्रतिनिधी असल्याने आमच्या नजरेस ह्या बाबी येतात. ३५ गुण असलेल्या शाळांना सुद्धा नामांकित करण्यात आले आहे. गडचिरोलीमध्ये एका शाळेला ३० गुण मिळाले होते. ज्यावेळी एटीसीची तपासणी झाली त्यावेळी त्या अहवालानुसार प्रकल्प स्तरावर ती शाळा नामांकित शाळेच्या निकषामध्ये बसली नाही तरी सद्धा राज्य शासनाकडून ती यादीमध्ये आली. यादीमध्ये आल्यानंतर त्या शाळेला विद्यार्थी देण्यात आले. त्या शाळेमध्ये किमान भौतिक सुविधा देणे अपेक्षित आहे. मात्र त्या शाळेमध्ये मुले तेथेच जेवतात, तेथेच झोपतात आणि शाळाही तेथेच शिकतात. मैदानाच्या नावाखाली जनावरांच्या गोठ्यापुढे ती मुले खेळतात अशी परिस्थिती आहे.

दुसरी बाब शालोम येथे घडलेल्या घटनेची आहे. शालोम येथील शाळेमध्ये ज्या विद्यार्थ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला त्याबाबत त्याच्या आईवडिलांना शाळेमध्ये बोलावून तो विद्यार्थी आजारी असल्याचे सांगण्यात आले होते. रात्रीच्या वेळी त्याचे आईवडील आल्यानंतर त्यांच्या हातामध्ये थेट त्या विद्यार्थ्याचा मृतदेह सुपूर्द करुन तो घेऊन जाण्यास सांगितले. अक्षरशः त्या विद्यार्थ्याला गोणीमध्ये बांधून दिले होते. ही बाब अतिशय दुर्दैवी आहे. आपल्या प्रकल्पाच्या अनुषंगाने ज्या शाळांमध्ये चांगल्या दर्जाचे शिक्षण देऊ शकत नाही, वसतिगृहामध्ये काही ना काही अडचणी आहेत, शिक्षकांची संख्या कमी आहे. अन्नपदार्थ पुरविण्याच्या बाबतीत काही ना काही अडचणी येतात म्हणून आपण नामांकित शाळांची सुरूवात केली आहे. नामांकित शाळांमध्ये त्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण आणि चांगल्या सुविधा मिळाव्यात. आपण यासंबंधी काही धोरण आखणार आहात की नाही ? आपण आदिवासी आश्रमशाळांसाठी वेगळे आणि नामांकित शाळांसाठी वेगळे निकष का लावत आहात, कारण तोही मुलगा गरीब कुटुंबातूनच आलेला आहे. यामध्ये

दुजाभाव का करण्यात येत आहे ? या बाबतीत आपण निकष आणि धोरण कधी आखणार आहात यासंबंधी आयुक्तांनी समितीस हा निर्णय सांगावा. कारण या निर्णयासंबंधी आपल्या स्तरावरुन फाईलची प्रक्रिया सुरू होणे आवश्यक आहे. किंबहूना यासंबंधी आपल्याकडून काही हालचाली सुरू झाल्या आहेत काय आणि असल्यास तेही सांगण्यात यावे असे निर्देशित केले असता याबाबतीत सकारात्मक प्रस्ताव तयार करुन शासनाला सादर करण्यात येईल असे विभागाकडून समितीस आश्वासित केले.

**दिनांक १९ जून, २०१८ रोजी झालेली विभागीय सचिवांची साक्ष** :

**घरकुल योजना—**

समितीने दिनांक २५ एप्रिल, २०१८रोजी घेतलेली साक्ष विभागाकडून पुरेशी माहिती न दिल्याने पुढे ढकलण्यात आली होती. सदर अपूर्ण साक्ष दिनांक १९ जून, २०१८ रोजी आयोजित केली होती. त्यावेळेस समितीने शबरी घरकुल योजनेंतर्गत अनेक कामे प्रलंबित असून सुद्धा दुसरीकडे नवीन घरकुलांसाठी निधी दिला जात आहे. सुमारे ३० वर्षापूर्वीची अनेक कामे प्रलंबित असून, ती पूर्ण करण्यासाठी कोणते प्रयत्न केले जाणार आहेत अशी विचारणा केली असता प्रधान सचिवांनी या योजनेचा भौतिक अहवाल तयार आहे. यामध्ये किती खर्च येतो, कामे कोणत्या स्तरावर आहेत हे जाणून घेण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष असून तो ग्रामविकास विभागांतर्गत आहे. त्यानुसार निधी ग्रामविकास विभागाकडे वर्ग केला जातो. पीएमवायमध्ये लाभार्थी आहेत. त्यांना वगळून आर्थिक मर्यादा १ लाख २० हजार रुपयांपर्यंत केलेली आहे.

यावर घरकुलासाठी आपल्या विभागाकडून निधी दिला जातो. त्यानंतर घरकुल बांधले जाते. बांधकाम करण्यासाठी आदिवासी विकास विभागाची स्वतंत्र यंत्रणा निर्माण झाली आहे. याच धर्तीवर घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी आदिवासी विकास विभागाची यंत्रणा निर्माण झाली तर मुदतीच्या आत सर्व कामे होतील शबरी योजनेसाठी पात्र लाभार्थी आदिवासीच असला पाहिजे. प्रत्यक्षात मात्र तोआदिवासी लाभार्थी नसतो असे समितीच्या निदर्शनास आले आहे म्हणून आपल्या विभागाचा निधी आपणच खर्च केला पाहिजे असे समितीने मत व्यक्त केले.

**बिंदूनामावली :—**

समितीने शाळा परिचर ३, कामाठी ७,स्वयंपाकी १३ यांचा अनुशेष राहण्याची कारणे काय आहेत ? सन २००८ नंतर बिंदू नामावली नोंदवहीची तपासणी न करण्याची कारणे काय आहेत ? असा प्रश्न केला असता प्रधान सचिवांनी विदित केले की, आमच्या विभागाकडे एकूण ५ विभागांची बिंदू नामावली तपासून घेण्याचे काम शिल्लक होते. प्रयोग शाळा परिचराचे काम पूर्ण झालेले आहे. स्वयंपाकी, कामाठी आणि चौकीदार व सफाईदार यांनी त्यांची सर्व कागदपत्रे दिलेली आहेत. आता ते अंतिम स्तरावर आहेत. ही सर्व प्रकरणे या आठवड्यात पूर्ण होणार आहेत. प्रकल्प अधिकारी कार्यालयाने ८ ते ९ वेळा आयुक्त कार्यालयाकडे सन २००८ नंतरची बिंदू नामावली तपासणीसाठी पाठविले होते. परंतु, मावकने पुन्हा त्रुटी काढून पाठविले होते.

यावर सहायक आयुक्त मागासवर्ग कक्षाने पुढे नमूद केले की, विभागाने बिंदू नामावली सादर केली नव्हती, मात्र विभागाने मार्गदर्शन घेतले आहे. त्यांना पत्रान्वये कोणती कागदपत्रे लागणार आहेत, याबाबतची माहिती दिलेली आहे. तसेच वेबसाईटवर देखील माहिती दिलेली आहे. सेवा प्रवेश नियम, नियुक्ती झालेल्या उमेदवारांच्या नियुक्तीचे आदेश तसेच त्यांची नियुक्ती कोणत्या जातीमधून झालेली आहे, ज्यांची नियुक्ती झालेली आहे त्यांच्या जातीच्या दाखल्याची माहिती विचारलेली आहे. याबाबत आयुक्त कार्यालयातील वेबसाईटवर माहिती नमूद केलेली आहे.

**ठक्कर बाप्पा योजना :—**

समितीने, ठक्कर बाप्पा योजनेतंर्गत सामाजिक सभागृह, रस्त्याचे कॉक्रिटीकरण, ग्राम सचिवालय पाणी, वीज, पैसा किंवा सभामंडप या कामाबाबत प्रशासकीय मान्यता देतो. प्रशासकीय मान्यतेनंतर पुढच्या कामाला सुरुवात करणा-या संबंधीत एजन्सी, जिल्हा परिषद किंवा राज्याच्या इतर एजन्सी असतील तर त्यांचे टेंडरची प्रक्रिया पूर्ण करुन पुढे येतात. दरम्यानच्या काळात या सर्व प्रक्रियेला उशीर होतो. जिल्हा परिषद कडील ठक्कर बाप्पा योजनेच्या निधीची दोन वर्षाची मर्यादा आहे. असे असताना जर कामाला उशीर झाला तर १ ते १० पर्यंतच्या कामासाठी ५० टक्के पैसे पाठवले जातात आणि नंतर कामे पूर्ण होतील या उद्देशाने ५० टक्के पैसे नंतर पाठविले जातात. नंतर हे पैसे स्वतःच्या बीडीएसवरुन काढून इतर खात्यात ठेवले जातात हे जर शासनाच्या दृष्टीकोनातून पाहिले तर चुकीचे वाटते. म्हणून त्यातील एक मार्ग म्हणून जिल्हा परिषदे प्रमाणे प्रकल्प अधिका-यांना पैसे खर्च करण्यासाठी किमान दोन वर्षाचा कालावधी द्यावा असा प्रस्ताव शासनापुढे ठेवला आणि मा. मुख्यमंत्र्यांनी त्याला मान्यता देऊन हा विषय कॅबिनेटमध्ये घेतला तर निश्चितपणे या विषयाला आणखी चालना देता येईल. यावर सचिवांनी विदित केले की, ही एक चांगली सूचना आहे. कॉरपसला धोरणात्मक किंवा कायदेशीर संरक्षण द्यायचे असेल तर ते पैसे कॅरी फॉरवर्ड झाले पाहिजेत. तसेच ते जास्त कॅरी फॉरवर्ड होणार नाही असे त्याचे नियोजन असायला हवे. कारण पैसे जरी प्रकल्प कार्यालयाकडे असले तरी अंतर्गत रस्ते, समाज मंदिर किंवा पाणीपुरवठा असेल तरी प्रकल्प कार्यालयास जिल्हा परिषद किंवा राज्याच्या यंत्रणेमार्फतच कामे करावी लागतात. ज्या ज्या विभागाला आदिवासी विभागाचा पैसा जातो त्या विभागाने शासन निर्णय निर्गमीत करण्याच्या आधी आदिवासी विभागाची संमती घेतली पाहिजे. वैयक्तिक लाभार्थी योजना आदिवासी विभागाने आतापर्यंत राबविलेली नाही. वैयक्तिक लाभ घेणा-या ज्या ज्या योजना आहेत त्या सर्व योजना आदिवासी विभागाच्या मार्फत राबविल्या गेल्या पाहिजेत. कारण ३ ते ५ वर्षापासून वैयक्तिक लाभार्थ्यांची परिस्थिती अत्यंत अडचणीची होत आहे. अशा योजना प्रकल्प कार्यालयातूनच राबविल्या गेल्या पाहिजेत. त्यामुळे सर्व अटी व शर्ती कळतील. वैयक्तिक लाभार्थीच्या योजना प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून राबविण्यात याव्यात.

**नामांकित आश्रमशाळा :—**

समितीने, पाचगणी येथे एकूण किती शाळा आहेत त्यांची सद्य:स्थिती व डहाणू प्रकल्पातील शाळेतील मृत्यू याबाबत माहिती देण्यास सांगितले असता विभागीय प्रतिनिधींनी विदित केले की,पाचगणी येथे एकूण ९ नामांकित शाळा आहेत. डहाणू प्रकल्पातील शाळेमध्ये एका मुलाचा मृत्यु झाला होता. या मृत्युची माहिती मिळताच ताबडतोब सातारा येथील पोलीस अधिक्षकांना भेटून अपघाती मृत्युची केस रजिस्ट्रर करण्यास सांगितले. यामध्ये तहसिलदारांना कार्यकारी दंडाधिकारी म्हणून चौकशी करण्यासाठी प्राधिकृत केले होते.

समितीने यावर, त्या मुलाचा मृत्यू झाल्यामुळे त्या कुटुंबाची खूप मोठी हानी झालेली आहे. परंतु, अद्याप त्या संस्थेवर एफआयआर दाखल करण्यात आलेला नाही. आपण जे सांगत आहात ते समितीला मान्य आहे. समितीने तेथे जाऊन चौकशी केलेली आहे. अधिकारी व संस्थेचे संगनमत असल्यामुळे त्या आदिवासी कुटुंबावर अन्याय झालेला आहे. त्यांनी एफआयआर दाखल केलेला नाही. संबंधित संस्थेवर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. त्या मुलाच्या कुटुंबाला कोणतीही आर्थिक मदत मिळालेली नाही. तो मुलगा ८ दिवसांपासून आजारी असूनही संस्थेने लक्ष दिले नाही. केवळ संस्थेच्या हलगर्जीपणामुळेच त्या मुलाचा मृत्यू झालेला आहे असे समितीचे म्हणणे आहे. एफआयआर दाखल झाला असता तर पोलीस विभागाच्या माध्यमातून पोस्ट मार्टेम किंवा तो मुलगा किती दिवसापासून आजारी होता, त्याला कोणता आजार झाला होता हे कळले असते. ज्या मुलाचा मृत्यू झालेला आहे त्याच्या कुटुंबाप्रती आपली सहानुभूतीची भावना असली पाहिजे. आपण या केसमध्ये त्या विद्यार्थ्याच्या कुटुंबाला आर्थिक मदत दिली पाहिजे.

नामांकित शाळेतील आदिवासी विद्यार्थी वेगळ्या वर्ग खोलीत शिक्षण घेतात. आपण नामांकित शाळांची निवड करतो, नामांकित शाळांचे निकष वेगळे आहेत. परंतु, नामांकित शाळेतील अनुसूचित जमातीचे विद्यार्थी वेगळ्या वर्ग खोलीत शिक्षण घेतात, वेगळे बसून जेवण करतात हा त्यांच्यावर अन्याय आहे. या संदर्भात तक्रार केल्यानंतर आपण कोणती कारवाई केली असा प्रश्न केला असता सचिवांनी विदित केले की, विभागातर्फे पथक तयार करुन नामांकित शाळेतील इन्फ्रास्ट्रक्चर किंवा इतर सोई सुविधांबाबत यापुढे अचानक तपासणी करण्यात येईल. नवीन नामांकित शाळा सुरू करण्यासाठी लावलेले आहेत, नवीन शासन निर्णय काढलेला आहे. संस्था चालक त्या विरोधात डेलिगेशन घेऊन आले होते. आदिवासी मुलांना वेगळे बसविले जाते, त्यांची वेगळी वर्ग खोली केली जाते. आदिवासी मुलांना बिगर आदिवासी मुलांबरोबर राहून जेवण करणे, शिक्षण घेणे इत्यादी गोष्टींचा अनुभव आला पाहिजे. या संदर्भात दक्षता घेण्यात येत आहे.

समिती यावर पाचगणी येथे ९ नामांकित शाळा आहेत, त्या ९ नामांकित शाळांची चौकशी करावी, असे निदेशित केले.

**अनुसूचित जमातींसाठी राबवावयाच्या योजना —**

समितीने, बालहिरड्याची खरेदी एकाधिकार केंद्रामार्फत झाली पाहिजे केंद्र सरकारच्या योजनेमध्ये बालहिरड्याचा समावेश नाही. बालहिरड्याचा दर जास्त असतो. त्यामध्ये वनौषधीचे गुण मोठ्या प्रमाणात असतात. या अगोदर बालहिरड्याची खरेदी केली जात होती. बाजारात विकल्यानंतर चांगला भाव मिळत होता. त्यामुळे टीडीसीला त्यातून चांगला फायदा होत होता. आज केंद्राची एमएसपी आठ रुपये असल्यामुळे त्या दराने सगळीकडे खरेदी सुरु आहे. त्यामुळे लोक नाराज आहेत. यासाठी शासनाने धोरण आखले पाहिजे.

सचिवांनी यावर असे नमूद केले की, आपल्या राज्यासह सर्व राज्यांची केंद्र शासनाकडे एकत्रित कार्यशाळा झाली होती. त्यामध्ये आपल्या राज्यातील वनोपज केंद्र शासनाच्या एमएसपीमध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात आम्ही यादीसह सादरीकरण केले होते. आमच्या सादरीकरणात जे मार्केटचे भाव आहेत ते केंद्र शासनाने कमी केले आहेत, त्यामध्ये किती तफावत आहे ते तपासून पहावे लागेल. एमएसपी व बाजारभावात जास्त फरक नसेल तर एमएसपीला वाव मिळणार नाही. केंद्र शासनाने एमएसपीच्या वस्तूंबाबत तज्ज्ञ समिती नियुक्त केली होती. समितीने एमएसपीबाबत निर्णय घेतलेला नाही. नवीन वस्तूंचा समावेश करण्याचा निर्णय केंद्र शासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे. केंद्र शासन जोपर्यंत रिव्हाईज करीत नाही तोपर्यंत काही करता येत नाही. समितीने सांगितल्याप्रमाणे मागील वर्षात बालहिरड्याची खरेदी टीडीसीने केली होती. आज टीडीसीची परिस्थिती अशी आहे की, ते जी वस्तू विकत घेतात ती नफ्यात जात नाहीत. त्यामुळे नुकसान जास्त वाढणार नाही हे देखील बघावे लागते. या प्रकरणात ते आर्थिकदृष्ट्या कसे फायदेशीर होईल ते तपासून पाहण्यात येते.

समितीने, ऑईल इंजिन आणि पाईपची खरेदी टीडीसीमार्फत करण्यात येत होते. तीन ते चार वर्षापासून खरेदी करण्यात आलेली नाही. नवीन आदिवासी लाभार्थ्यांना पाईप व इंजिन देतो म्हणून जिल्हा परिषदेकडे पैसे वर्ग केले आहेत. जिल्हा परिषदेने आदिवासी विभागाला पत्र पाठविले आहे की, ही योजना आम्ही सुरु करीत नाही. इंजिन व पाईप संदर्भात कोणते धोरण राबविण्यात येणार आहे, अशी विचारणा केली असता प्रधान सचिवांनी विदित केले की, इंजिन व पाईप वाटप योजने संदर्भात न्या. गायकवाड समिती स्थापन करण्यात आली होती. यामध्ये डुप्लीकेशन होऊ नये म्हणून मागील वर्षी धोरणात्मक निर्णय घेतला होता की, ही योजना कृषी विभागाने राबवावी. कारण कृषी विभाग एकत्रित संच देतो. त्यामध्ये वीजपंप, पाईप लाईन व इंजिनचा समावेश असतो. कृषी विस्तार अधिका-याकडे शेतक-यांची यादी असते. आदिवासी शेतक-यांना कृषी विभागाने या योजनेचा लाभ द्यावा. तो विषय त्यांनी तेव्हा मान्य करुन पुढील आर्थिक वर्षानंतर ही योजना आम्ही सुरु करणार आहोत पण बॅकलॉग आम्ही काढणार नाही असे कळविले आहे. मागील दोन वर्षाचे अनुषेश कृषि विभागाने काढण्यास नकार दिला तर प्रकल्प अधिकारी कार्यालयामार्फत लाभार्थ्यांची निवड करुन त्यांना पाईप व इंजिन न देता त्यांच्या खात्यावर डीबीटीद्वारे निधी हस्तांतरीत करण्यात येईल. यासंदर्भात कृषी सचिवांशी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल.

वैयक्तिक लाभ किंवा विकास कामांचा निधी आदिवासी विभागाकडून वेगवेगळ्या विभागांना दिला जातो. जिल्हा परिषद व कृषी, राज्यशासन यांना देण्यात येतो. लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया व लाभार्थ्यांना जी माहिती व्हायला पाहिजे त्याबाबत जनजागृती त्या त्या विभागाच्या माध्यमातून योग्यरित्या होत नाही. विभागाने निर्णय करताना प्रकल्प कार्यालयाचा एक अधिकारी निवड प्रक्रियेत समाविष्ट असणे आवश्यक आहे, जेणेकरुन प्रकल्प कार्यालयास विचारता येईल की, आपण कोणकोणत्या योजनांसाठी किती निधी दिला. त्यासाठी कोणत्या सुविधा सुरु आहेत. अशा प्रकारची संपूर्ण माहिती प्रकल्प कार्यालयातील अधिका-यांना माहीत असावयास पाहिजे. ही प्रक्रिया राबविते वेळी आदिवासी विकास विभागाचा १०० टक्के सहभाग असल्याशिवाय स्वतंत्ररित्या कोणत्याही विभागाने आदिवासी विभागाला वगळून लाभार्थ्यांची यादीस अंतिम मान्यता देऊ नये.

**अभिप्राय व शिफारशी**

**सबळीकरण व स्वाभिमान योजना :—**

१) समितीने दिनांक २५ एप्रिल,२०१८ व दिनांक १९ जून, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्यावेळी, भूमिहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींसाठी सबळीकरण व स्वाभिमान योजना राबविण्यासाठी भूमीहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींना शासनातर्फे जमिनी देण्यात येतात. त्यामध्ये शासनाचे ५० टक्के अनुदान आणि कर्जाची रक्कम ५० टक्के असे प्रमाण आहे. या योजनेमध्ये शासन ज्यांच्या कडून जमिनी खरेदी करते त्या जमिनी शासनाच्या प्रचलित शिघ्र सिद्धगणकाचे दर व त्यापेक्षा २० टक्के अधिक दर देऊन खरेदी केल्या जातात व त्यानंतर त्या वरील अनुदान व कर्ज या रुपाने आदिवासींना जमिनी देण्यात येतात. परंतु प्रत्यक्षात बाजारभावापेक्षा शासनाच्या प्रचलित शिघ्र सिद्धगणकाचे दर किंवा त्यावरील वाढीव २० टक्के दराची रक्कम देऊन सुद्धा अशा जमिनी देण्यास कोणी तयार होत नसल्याचे समितीला आढळून आले आहे.

त्याचप्रमाणे ही योजना जशी आदिवासी विभागाकडून राबविली जाते. अशाच प्रकारची योजना सामाजिक न्याय विभागामध्येही राबविण्यात येते. त्यांच्यातर्फे योजना राबविताना त्यामध्ये निकष वेगळे आहेत, त्यामुळे यामध्ये सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने संपूर्ण राज्यासाठी एकसारखे निकष असावेत याकरिता महसूल विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित आहे. कारण जमिनीचे मुल्यांकन व दर ठरविण्याचे काम महसूल विभागामार्फत करण्यात येते असे साक्षीच्या वेळी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी समितीस अवगत केले. जमीन विकत घेवून ती भूमिहीनांना देण्याची ही महत्वपूर्ण योजना असल्याने एकाच जिल्ह्यात वेगवेगळे निकष असतील तर त्यामध्ये अडचण निर्माण होईल. या **योजनेमध्ये समानता व सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने भूसंपादन अधिग्रहण कायदयाच्या प्रक्रियेचा अवलंब करुन भूमिहीन आदिवासींसाठी ही योजना राबविण्याच्या दृष्टीने आदिवासी विभाग व महसूल विभागाने धोरणात्मक निर्णय लवकरात लवकर घ्यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**आदिवासींसाठी राबवावयाच्या घरकुल योजना :—**

(२) आदिवासी विकास विभागाकडून तीन घरकुल योजना आदिवासींसाठी राबविण्यात येतात. यामध्ये शबरी घरकुल योजना, आदिम जमाती घरकुल योजना व पारधी घरकुल योजना या योजना आहेत. शबरी घरकुल योजनेअंतर्गत १५ वर्षापूर्वी ज्याना घरकुल वाटप करण्यात आले होते ते आता मोडकळीस आले असून राहण्यास योग्य नसल्याचे अशा लाभार्थ्यांना पुन्हा खास बाब म्हणून शबरी घरकुल योजनेच्या त्या लाभार्थ्यांना पुन्हा लाभ देण्याबाबत विचारणा केली असता घरकुलांच्या बाबतीत ग्रामविकास विभागाने एक राज्य व्यवस्थापन कक्ष स्थापन केला असून सर्व प्रकारच्या घरकुल योजना ग्रामविकास विभागामार्फत राबविल्या जातात. पूर्वी ज्यांना घरकूले या योजनेतून मंजूर झाली आहेत ती मोडकळीस आली तरी त्यांना पुन्हा नव्याने या योजनेतून घरकुले देणे सध्या तरी शक्य नसल्याचे विभागाने समितीच्या निदर्शनास आणून दिले.

त्यावर समितीने, उक्त घरकूल योजनांसाठी १५ वर्षापुर्वी फक्त२८ हजार ५०० रूपये मिळत होते. आता त्याच घरांसाठी सुमारे दीड लाखांपर्यंत निधी दिला जातो. पूर्वी बांधलेली घरे कच्च्या मातीची असल्याने ती जीर्ण व मोडकळीस आलेली आहेत, त्या घरांना दुबार लाभ देण्यात येत नाही. मात्र १५ वर्षीपूर्वीच्याच शाळा किंवा सरकारी इमारतींच्या दुरुस्ती साठी मुबलक निधी दिला जातो. हा विरोधाभास आहे. **सबब, १५ वर्षापूर्वी उक्त योजनांतर्गत बांधलेल्या कच्च्या घरांच्या लाभार्थ्यांना पुन्हा लाभ देण्यासाठी आदिवासी विकास विभागाने राज्य व्यवस्थापन कक्षाकडे प्रस्ताव पाठवून धोरणात्मक निर्णय घ्यावा व घेतलेल्या निर्णयाची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी शिफारस ही समिती शासनास करीत आहे.**

**बिंदूनामावली :—**

(३) दिनांक १९ जून, २०१८ रोजी घेतलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्रकल्प कार्यालयामध्ये सन २००८ नंतर बिंदू नामावली तपासण्यात आली नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सन २०१६ मध्ये समितीने दौ-याच्या वेळी या संदर्भात सूचना दिल्या होत्या त्या नंतरही सन २०१८ पर्यंत बिंदू नामावली अद्ययावत न करता ती अपूर्ण ठेवणे गंभीर बाब आहे. बिंदू नामावली ही त्या कार्यालयाचा आरसा असतो. बिंदू नामावली प्रमाणित असणे म्हणजे कार्यालय अद्ययावत आहे असे समजले जाते. समितीच्या दौ-याच्या वेळी सूचना देऊनही त्याच चुका पुन्हा पुन्हा होतात.

**याबाबत समिती अशी शिफारस करते की, सन २००८ पासून प्रलंबित असलेली बिंदूनामावली अद्यावत करून बिंदूनामावली प्रलंबित ठेवणा-या दोषी व्यक्तींविरुद्ध लवकरात लवकर कारवाई करून त्याबाबतची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी.**

**घोडेगाव प्रकल्पांतर्गत येणा-या नामांकित आश्रम शाळा :—**

(४) घोडेगाव प्रकल्पकार्यालयांतर्गत महाबळेश्वर येथील पाचगणी, पुणे येथील आळंदी व जुन्नर तालुक्यातील लांडेवाडी येथे या नामांकित आश्रमशाळा आहेत. नामांकित शाळांमधील एका विद्यार्थ्यासाठी प्रत्येक वर्षाला ५० हजार रुपये अनुदान देण्यात येते. तालुका स्तर, जिल्हा स्तर व विभागस्तर असे तीन स्तर आहेत, तालुका स्तरावर ४० हजार रुपये, जिल्हास्तरावर ४५ हजार रुपये व विभागीय स्तरावर ५० हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

आदिवासी विकास विभागाकडून नामांकित शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणात पैसा खर्च करण्यात येतो. तथापि, त्या पैशाचा संस्थाकडून आदिवासी विर्द्यार्थ्यांवर योग्य विनियोग न करता दुरूपयोग केला जातो. त्याच पैशाचा आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांवर वापर केला तर त्याचा सदूपयोग झाल्यासारखे होईल. नामांकित शाळेबाबत संस्थांची मनमानी चालू राहिली तर विद्यार्थ्यांना देण्यात येणारे अनुदान बंद करून आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत प्रवेश न देता आदिवासी आश्रमशाळेतच प्रवेश देण्याच्या निर्णयापर्यंत समिती आली आहे. दिनांक २५ एप्रिल, २०१८ व १९ जून, २०१८ रोजी समितीने घेतलेल्या विभागीय साक्षीच्या वेळी नामांकित शाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांना वेगळ्यावर्गात बसवून शिक्षण दिले जाते. त्यांना वेगळे बसवून जेवण दिले जाते. आदिवासी मुलांना बिगर आदिवासी मुलांबरोबर राहून जेवण करणे, शिक्षण घेणे, या गोष्टी पासून दूर ठेवले जाते. आदिवासी आश्रमशाळांसाठी वेगळे आणि नामांकित शाळांसाठी वेगळे निकष शाळा संस्थानकडून लावले जातात. आणि त्याला संबंधित विभागाची ही साथ असते. आदिवासी विद्यार्थी आणि बिगर आदिवासी विद्यार्थी यांच्यामध्ये दुजाभाव होत असल्याचे असे समितीच्या निदर्शनास आले आहे. **म्हणून समिती अशी शिफारस करीत आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांबरोबर दुजाभाव केल्यास नामांकित शाळेची मान्यता रद्द करण्यात यावी तसेच नामांकित शाळेला मान्यता देताना त्याशाळेमध्ये उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मुल्यांकनाचे निकष अधिक कठोर करण्याबाबतचा निर्णय शासनाने घ्यावा व घेतलेल्या निर्णयांची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करण्यात यावी.**

**ठक्करबाप्पा वस्तीसुधार योजना :-**

(५) ठक्करबाप्पा वस्तीसुधार योजनेसाठी आदिवासी विकास विभागाकडून मोठ्याप्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला जातो. या योजनेअंतर्गत सामाजिक सभागृह, रस्त्याचे काँक्रिटीकरण, ग्राम सचिवालय, पाणी, वीज, किंवा सभामंडप इ. कामे जातात. ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमातर्गंत आदिवासी उपयोजना क्षेत्रात करावयाच्या कामांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना दिले आहेत. परंतु या कामांसाठी आदिवासी विकास विभागाकडून शासनाच्या यंत्रणांना निधी पुरवला जातो. मात्र प्रशासकीय मंजुरीचे अधिकार विभागाला नाहीत. असे समितीस भेटीच्या व साक्षीच्यावेळी आढळून आले आहे. यास्तव **ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजना मंजूर करण्याचे अंतिम**

**अधिकार हे अपर आयुक्त, आदिवासीं विकास विभाग यांच्याकडे असावेत तसेच याबाबतचा निधी खर्च करण्यासाठी दोन वर्षांचा कालावधी निश्चित करावा व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समिती शासनास शिफारस करीत आहे.**

**वैयक्तिक लाभाच्या योजना :—**

(६) समितीने केलेल्या दौ-याच्यावेळी तसेच साक्षीच्यावेळी समितीला आढळून आले आहे की, लाभार्थी निवडताना प्रकल्प कार्यालयाला विश्वासात घेण्यात येत नाही. लाभार्थी आदिवासी, निधी आदिवासी विभागाचा, असे असताना सुद्धा निवड प्रक्रियेत आदिवासी विकास विभागाच्या अधिका-यांना समाविष्ट केले जात नाही. लाभार्थ्यांची निवड प्रकल्प अधिका-यांकडूनच झाली पाहिजे पुणे जिल्ह्यात गेल्या साडेतीन वर्षापासून वैयक्तिक लाभार्थ्यांची परिस्थिती अत्यंत अडचणीची होत आहे. **यास्तव शासनाने कोणतीही योजना राबविताना आदिवासी विकास विभागाचा सहभाग असल्याशिवाय वैयक्तिक लाभार्थी योजनेस मंजुरी देण्यात येऊ नये असा निर्णया घ्यावा व घेतलेल्या निर्णयाची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.**

(७) आदिवासी विकास विभागाच्या विविध योजना आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारित येणा-या आयुक्त कार्यालय, अपर आयुक्त कार्यालय व प्रकल्प कार्यालय स्तरावरून राबविण्यात येतात. समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, उक्त कार्यालयात बहुतेक वेळा तात्पुरते कर्मचारी व अधिकारी यांची नेमणूक करण्यात येते. तसेच आयुक्त, अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांच्याकडे अनेक खात्याचा अतिरिक्त कार्यभार दिला जातो. यामुळे आदिवासीसाठी राबवावयाच्या योजनांवर विपरित परिणाम होत असतो. यासाठी शासनाने जर कायमस्वरुपी अधिकारी/कर्मचा-यांची नियुक्ती केली तर योजना प्रभावीपणे राबविता येऊ शकतात त्याचप्रमाणे विभागाच्या योजनांसाठी वितरीत करण्यात येत असलेल्या निधीचा योग्य व विहित वेळेत विनियोग होण्यास मदत होईल. **यास्तव शासनाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात कायमस्वरुपी प्रकल्प अधिका-यांची नेमणूक करण्यासाठी निर्णय घ्यावा व घेतलेल्या निर्णयाची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस सादर करावी अशी समिती शिफारस करित आहे.**

(शा.म.मु.) एचबी १४३१—५ (६००—११-२०१८)

# (समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त)

पहिली बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(३) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(४) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(५) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(६) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(७) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(८) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(९) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(१०) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

**विभागीय अधिकारी**

(१) श्री.सौरभ राव, जिल्हाधिकारी, पुणे,

(२) श्री.कांतीलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

(३) श्री.राजेंद्र मुठे, निवासी उप जिल्हाधिकारी, पुणे

(४) श्री. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता (सा.बां.)

(५) श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

(६) श्री. नितीन माने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(७) श्री. दत्तात्रय मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(८) श्री. डी. एन. कुलकर्णी, कार्यकारी अधिकारी

(९) श्री. मिलिंद गवादे, अपर आयुक्त, आदिवासी विकास ठाणे.

(१०) श्रीमती. चेतना मोरे, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, घोडगाव.

(११) श्री. डी. डी. मायी, सह आयुक्त, टीआरटीआय, पुणे

(१२) श्री. सि.ता. भालेकर, उप संचालक, पुणे.

(१३) श्रीमती स्नेहा देवकाते, सहायक आयुक्त (मावक)

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी, जिल्हापरिषद व प्रकल्प कार्यालय, घोडेगाव या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची सरळसेवा भरती, बढती, आरक्षण, अनुशेष व अनुसूचित जमातीतील कर्मचां-याच्या जात पडताळणी विषयक प्रकरणे तसेच अनुसूतिच जमातीसाठी राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

**दुसरी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २४ फेब्रुवारी, २०१६ रोजी प्रकल्प कार्यालय, घोडेगाव, जि. पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स

(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(४) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(५) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(६) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(७) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(८) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(९) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(१०) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(११) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

**विभागीय अधिकारी**

१) श्री. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता, पुणे

२) श्री. बी. के. लोंढे, सहायक प्रकल्प अधिकारी, घोडेगाव

३) श्री. के. एम. आबुज, प्रभारी, मुख्याध्यापक

४) डॉ. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे

५) श्री. जे.आर. विभुते, कार्यकारी अभियंता, पुणे

६) श्री. वि.रा. मोरे, सहायक प्रकल्प अधिकारी.

समितीने दिनांक २४ फेब्रुवारी २०१६ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत येत असलेल्या विविध उपक्रमांना व कामाच्या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

**तिसरी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २५ फेब्रुवारी २०१६ रोजी जिल्हाधिकारी पुणे येथे झाली. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.

(४) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(५) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(६) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(७) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.

(८) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.

(९) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(१०) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(११) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

**विभागीय अधिकारी**

श्रीमंती चेतना मोरे, प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, घोडेगाव.

समितीने जिल्हाधिकारी व जिल्हापरिषद कार्यालयांतर्गत येत असलेल्या विविध यंत्रणांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्रात राबविण्यात येणा-या कल्याणकारी योजनांबाबत संबंधित अधिका-यांबरोबर चर्चा केली.

**चौथी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २६ फेब्रुवारी २०१६ रोजी जिल्हाधिकारी पुणे येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स.
(३) श्री. राजू तोडसाम, वि.स.स.
(४) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.
(५) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.
(६) श्री. संजय पुराम, वि.स.स.
(७) प्रा. चंद्रकांत सोनवणे, वि.स.स.
(८) श्री. काशिराम पावरा, वि.स.स.
(९) श्री. वैभव पिचड, वि.स.स.
(१०) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.
(११) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव
(२) श्री. आनंद राहाटे, कक्ष अधिकारी

**विभागीय प्रतिनिधी**

१) श्री. कांतिलाल उमाप, मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पुणे
२) श्री. राजेंद्र मुठे, निवासी उप जिल्हाधिकारी, पुणे
३) श्री. यशवंत शितोळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पुणे
४) श्री. पियुष सिंह, आयुक्त, समाजकल्याण संचालनालय, पुणे
५) श्री. के. एम. नागरगोजे, आयुक्त, महिला व बालविकास विभाग
६) श्री. भगवान पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी, पुणे

७) श्री. एस. बी. विधाटे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

८) श्री. सुनिल खैरनार, कृषी विकास अधिकारी

९) श्री. दिनेश डोके, प्रकल्प संचालक

१०) डॉ. जय जाधव, पोलिस अधिक्षक पुणे (ग्रामीण)

११) श्री. एस. बी. सुर्यवंशी, पोलिस उपआयुक्त, मुख्यालय, पुणे

१२) श्री. डी. वाय. पाटील, अधिक्षक अभियंता

१३) श्री. डी. एन. कुलकर्णी, कार्यकारी अभियंता (ग्रापापु)

१४) श्री. प्रशांत पाटील, कार्यकारी अभियंता

**मागासवर्गीय कक्ष**

श्रीमती स्नेहा देवकाते, सहाय्यक आयुक्त, पुणे

**जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, पुणे**

(१) श्री. डी. डी. मायी, सह आयुक्त

(२) श्री. सि. ता. भालेकर, उप संचालक

**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय घोडेगांव पुणे.**

(१) श्रीमती चेतना मोरे, प्रकल्प अधिकारी

(२) श्री.वि.रा.मोरे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी

उक्त बैठकीत समितीने जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद व प्रकल्प अधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकीच्या वेळी आश्वासित केलेल्या मुद्याबाबत व समितीने आदिवासी उपयोजना क्षेत्रातील कामांना दिलेल्या भेटीच्यावेळी आढळून आलेल्या त्रुटी संदर्भात संबंधित अधिका-यांबरोबरआढावा बैठक घेतली

**पाचवी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २२ नोव्हेंबर २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती**

(१) श्री. रुपेश म्हात्रे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. पंकज भोयर, वि.स.स.

(३) श्री. राजाभाऊ (पराग) वाजे, वि.स.स

(४) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(५) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(६) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(७) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(८) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवाल**

**श्री. राजेश तारवी, उप सचिव**

**श्री. संजय कांबळे, कक्ष अधिकारी**

**विभागीय प्रतिनिधी**

(१) श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग

(२) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग

(३) श्री. सौरभ राव, जिल्हाधिकारी, पुणे

(४) श्री. आर. जी. कुलकर्णी आयुक्त आदिवासी विकास विभाग

(५) श्री. टी. वा. करपते, उपसचिव, सामान्य प्रशासन विभाग

(६) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(७) श्री. ल. गो. ढोके, उप सचिव, आदिवासी विकास विभाग

(८) श्री. चंद्रकांत डांगे, अपर आयुक्त, ठाणे

(९) श्री. आयुष प्रसाद, प्रकल्प अधिकारी

(१०) श्रीमती. स्नेहा देवकाते, सहा. आयुक्त (मावक) पुणे

(११) श्री. सि. ता. भालेकर, उप संचालक, पुणे.

उक्त बैठकीत समितीने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयातील अनुसूचित जमतीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणा-या विविध योजनांबाबत संबंधित विभागाच्या सचिवांबरोबर चर्चा केली.

**सहावी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २५ एप्रिल २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स.

(२) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(३) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

(४) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

(५) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. राजेश तारवी, उप सचिव

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

**विभागीय प्रतिनिधी :**

(१) श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसूल विभाग

(३) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव आदिवासी विकास विभाग

(४) श्री. नवल किशोर राम, जिल्हाधिकारी, पुणे

(४) श्री. चंद्रकांत डांगे, अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे

(५) श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास

(६) श्री. सूरज दि. मांढरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

(७) श्री. एस. एस. चिंचवडे, आयुक्त (मावक), पुणे

(८) श्री. ल. गो. नेदे, उप सचिव, आदिवासी विकास विभाग

(९) श्री. एम. एस. धुले, उप सचिव (सा.प्र.वि.)

(१०) श्री. आयुष प्रसाद, प्रकल्प अधिकारी, घोडेगाव.

समितीने या बैठकीत पुणे जिल्हाधिकारी कार्यालय व प्रकल्प कार्यालय, घोडेगाव या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत कामांना दिलेल्या भेटी संदर्भात मंत्रालयीन सचिव व संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली.

**सातवी बैठक**

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक १९ जून २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :—

**उपस्थिती :**

(१) डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. पास्कल धनारे, वि.स.स.

(३) श्री. संजय पुराम, वि.स.स.

(४) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(५) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(६) श्री. पांडुरंग बरोरा, वि.स.स.

(७) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. राजेश तारवी, उप सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

**जिल्हा परिषद, पुणे :**

(१) श्री. सूरज दि. मांढरे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

(२) श्री. एम. एस. घुले, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. दिपक गोडे, कार्यकारी अभियंता

(४) श्रीमती मैथिली सांजूर्णे, कार्यकारी अभियंता

(५) श्रीमती स्नेहा देवकाते, सहायक आयक्त (मावक)

(६) श्री. सि. ता. भालेकर, सह आयुक्त, अ.ज. प्र.प. समिती.

समितीने या बैठकीत पुणे जिल्हा परिषदेच्या कार्यालयातील अनुसूचित जमातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांतर्गत येणा-या कामांना दिलेल्या भेटीच्या संदर्भात विभागीय सचिव व संबंधित अधिका-यांची साक्ष घेतली.

## आठवी बैठक

अनुसूचित जमाती कल्याण समितीची बैठक दिनांक २८ नोव्हेंबर २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

**उपस्थिती :**

(१) प्रा. डॉ. अशोक उईके, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. प्रभुदास भिलावेकर, वि.स.स.

(३) श्री. पास्कर धनारे, वि.स.स.

(४) श्री. शांताराम मोरे, वि.स.स.

(५) श्री. अमित घोडा, वि.स.स.

(६) डॉ. संतोष टारफे, वि.स.स.

(७) श्री. वैभव पिचड, वि.स.स.

(८) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. राजेश तारवी, उप सचिव.

(३) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. दामोदर गायकर, कक्ष अधिकारी

समितीने या बैठकीत पारुप अहवलावर विचार करून आवश्यक सुधारणांसह तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई